# महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग

## द्वितिय

## वार्षिक अहवाल

## (२०१८-२०१९)


### राज्य मुख्य  लोकसेवा  हक्क आयुक्त कार्यालय

नविन  प्रशासन भवन, ७ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक ,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२

# अनुक्रमणिका


| विभाग | तपशील | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| | **प्रस्तावना** | |
| | **प्रकरणे** | |
| **प्रकरण १** | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ | १ – ९ |
| | प्रारंभ | ३ |
| | अधिनियमाची वैशिष्ट्ये | ३ |
| | महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग | ४ - ५ |
| | आपले सरकार सेवा पोर्टल व मोबाईल ॲप | ६ |
| | प्रशिक्षण तांत्रिक / दिशानिदेशन – | ६ - ७ |
| | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाचा प्रवास २०१५-२०१७ व १७-२०१६ ,१६- एक दृष्टिक्षेप : १८ | ८ - ११ |
| **प्रकरण २** | आयोगाचे उपक्रम | १३ - २५ |
| **प्रकरण ३** | आपले सरकार सेवा पोर्टल व मोबाईल ॲप | २७ - ४० |
| **प्रकरण ४** | प्रशिक्षण क्षमता बांधणी | ४१ |
| | जागृकता प्रशिक्षण | ४१ - ४३ |
| | तांत्रिक प्रशिक्षण | ४३ - ४४ |
| **प्रकरण ५** | नागरिकांकडून लोकसेवा हक्काचा उपयोग | ४५ |
| | विभागवार अधिसूचित लोकसेवा | ४५ - ४७ |
| | संख्याशास्त्रीय माहिती व विश्लेषण | ४८ - ६४ |
| **प्रकरण ६** | शिफारशी सूचना व ,पुढील वाटचाल आणि नाविन्यपूर्ण उपक्रम . | ६५ |
| | सर्व विभागांना लागू सूचना व शिफारशी यांची सद्यस्थिती (१८-२०१७) | ६५ - ६७ |
| | विभागनिहाय सूचना व शिफारशी यांची सद्यस्थिती (१८-२०१७) | ६८ - ७० |
| | सर्व विभागांना लागू होणाऱ्या सूचना व शिफारशी (१९-२०१८) | ७१ - ७३ |
| | विभागनिहाय सूचना व शिफारशी (१९-२०१८) | ७३ - ७६ |
| | पुढील वाटचाल | ७६ - ८० |
| | नाविन्यपूर्ण उपक्रम | ८० - ८१ |
| | **परिशिष्टे** | |
| | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम | परिशिष्ट अ |
| | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत नियम | परिशिष्ट ब |
| | अधिसूचित लोकसेवांची सूची | परिशिष्ट क |

# प्रस्तावना

आपल्या राज्यातील नागरिकांना राज्य शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबद्ध पद्धतीने देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ पारित करण्यात आला. नागरिकांना अधिकार देणारा व प्रशासनाला जबाबदार व उत्तरदायी करणारा हा क्रांतिकारी कायदा आहे. शासनाच्या सेवा सामान्य माणसापर्यंत पोहचत नाहीत किंवा त्या सेवा प्राप्त करण्यासाठी नागरिकांना अनेकवेळा प्रयत्न करावे लागतात. या परिस्थितीमध्ये अमूलाग्र बदल करण्याच्या दृष्टीने सेवा हक्क कायदा पारित करण्यात आला. या कायद्याचे उद्दिष्ठ नागरिकांना तत्परतेने, सहज व सुलभपणे सेवा देण्यात यावी असे आहे.

महाराष्ट्रासह देशातील २० राज्यांनी लोकसेवा हक्क अधिनियम लागू केला आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा दिनांक २८ एप्रिल २०१५ पासून हा कायदा अमलात आला. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली नियमावली दिनांक १६ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. दिनांक १ मार्च, २०१७ रोजी माजी मुख्य सचिव श्री स्वाधीन क्षत्रिय यांची राज्याचे पहिले राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५चे कलम १९(१) प्रमाणे आयोग, प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्या नंतर, मागील वर्षा मधील आपल्या कार्याचा तसेच सार्वजनिक प्राधिकरणांच्या लोकसेवा देण्याच्या कामगिरीच्या मूल्यमापनाबाबतचा अहवाल तयार करील आणि तो राज्य शासनाला सादर करील. त्याचप्रमाणे कलम १९(२) प्रमाणे राज्य शासन, आयोगाने सादर केलेला वार्षिक अहवाल राज्य विधी मंडळाच्या प्रत्येक सभागृहा समोर ठेवील.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाचा हा दुसरा वार्षिक अहवाल आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात लक्षणीय प्रगती झाल्याचे दिसून येत आहे. ऑनलाईन दिल्या जाणाऱ्या सेवांच्या संख्येमध्ये महाराष्ट्र राज्याने आघाडी घेतली आहे. दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या एकूण ४८६ पैकी ४०६ सेवा ऑनलाईन स्वरुपात देण्यात येत आहेत. आपले सरकार पोर्टल व सेवा अधिकारांच्या मोबाईल ॲप द्वारे ऑनलाईन सेवा देण्यात येतात. त्याशिवाय ३०,८७८ आपले सरकार सेवा केंद्रांच्या माध्यमातून सुद्धा नागरिकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सदर अधिनियम लागू झाल्यापासून ऑनलाईन सुविधांचा लाभ घेऊन ६,४४,६५,६६८ अर्ज प्राप्त झाले आहेत व निपटाऱ्याचे प्रमाण ९७ % आहे. सन २०१८-१९ मध्ये एकूण १,८६,३८,६८१ सेवा अर्ज प्राप्त झाले असून निपटाऱ्याचे प्रमाण ९५% आहे. अनेक अर्ज ऑफलाईन स्वरुपात सुद्धा प्राप्त झालेले असल्याचे दिसून आले आहे. मात्र आयोगाने अनेक प्रयत्न करून सुद्धा, ऑफलाईन स्वरुपात प्राप्त झालेल्या व निपटारा केलेल्या अर्जांची आकडेवारी "अ", "ब" व "क" ह्या विहित नमुन्यांमध्ये उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे सदर अहवाल हा महाऑनलाईन द्वारे पुरविण्यात आलेल्या ऑनलाईन अर्जांच्या आकडेवारी वर आधारित आहे.

महाराष्ट्र राज्याने ४८६ विविध प्रकारच्या सेवा अधिसूचित करून महाराष्ट्र सार्वजनिक सेवा अधिनियमाच्या अंमलबजावणीत निश्चितपणे मोठी प्रगती जरी दाखवलेली असली तरीही अन्य राज्यांनी अधिक सेवा अधिसूचित केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. कर्नाटक राज्याने १०३३ सेवा, तर पंजाब राज्याने ५६८ सेवा व आसाम राज्याने ५०६ सेवा अधिसूचित केल्या आहेत. राज्य शासनातर्फे दिल्या

जाणाऱ्या  सर्व सेवांची एक संपूर्ण सूची तयार करण्याची व अधिनियमाच्या अंतर्गत सर्व सेवा अधिसूचित करण्यासाठी एक वेळापत्रक तयार करण्याची शिफारस आयोगाने याआधीच केली आहे. आयोगाची सदर शिफारस प्राधान्याने अमलात आणण्याची नितांत आवश्यकता आहे.

आयोगाकडून करण्यात आलेल्या काही सूचना व शिफारशींवर राज्य शासनाने कार्यवाही केली आहे. त्यामध्ये शासन परिपत्रक दिनांक १२.०३.२०१८ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांना सेवा अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी व आपले सरकार सेवा केंद्रांच्या माध्यमातून सर्व अधिसूचित सेवा उपलब्ध करून देण्यासाठी "नियंत्रण अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय समाविष्ट आहे. अशा निर्णयांमुळे सार्वजनिक सेवा अधिनियमाची परिणामकारक अंमलबजावणी होण्यास प्रोत्साहन मिळेल. मात्र सर्वसामान्य जनतेत सदर अधिनियमाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अधिक परिश्रम करणे आवश्यक आहे. अधिनियम अधिक लोकप्रिय करण्यासाठी आयोगाने बोधचिन्ह व घोषवाक्य निर्धारित केली आहे. सर्व विभागांनी सदर बोधचिन्ह व घोषवाक्य यांचा उपयोग करण्याची विनंती आयोगाने शासनाला केली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाचा दुसरा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी  यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रशिक्षण प्रबोधिनी (यशदा), पुणे व महाऑनलाईन यांचे बहुमूल्य सहकार्य प्राप्त झाले. या वार्षिक अहवालामध्ये  महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या आमंलबजावणीमध्ये वेगवेगळ्या विभागांनी केलेली कामगिरी, जिल्हानिहाय व महसूल विभागनिहाय मिळालेला प्रतिसाद या सर्वांचे तुलनात्मक मुल्यांकन करण्यात आले आहे. तसेच आयोगाने राज्य शासनाला केलेल्या महत्वपूर्ण सूचना व शिफारशी व ची सध्यस्थिती बाबतची माहिती देण्यात आली आहे. या सर्व माहिती व अनुभवाच्या आधारे पुढील वाटचालीबाबत काही सूचना करण्यात आल्या आहेत, जेणेकरून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची अधिक प्रभावी अंमलबजावणी  होऊ शकेल. पुणे, चंद्रपूर, वर्धा, वाशीम व अहमदनगर या जिल्हयामध्ये आयोगाच्या निर्देशनास आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची दाखल घेऊन त्याची इतर जिल्ह्यांमध्येसुद्धा पुनरुक्क्ती करण्याची शिफारस आयोग करीत आहे.

(स्वाधीन क्षत्रिय)
मुख्य आयुक्त,
महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग

## १.१ प्रारंभ

केंद्र शासनाने नेमलेल्या दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने सन २००५ च्या अहवालामध्ये नागरिकांना लोकसेवा सहज, सुलभ व कालबद्ध पद्धतीने उपलब्ध करून देण्याची शिफारस केली. त्यानुसार केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागांनी नागरिकांची सनद तयार केली. परंतू नागरिकांच्या सनदेमध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेचे पालन न झाल्यास सबंधित कर्मचारी / अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्याची स्पष्ट तरतूद करण्यात आली नव्हती. ही उणीव दूर करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम पारित करण्यात आला. सुशासनाबाबत महाराष्ट्र राज्य नेहमीच आघाडीवर राहिले आहे. या पूर्वी महाराष्ट्र शासकीय कामात विलंब करण्यास प्रतिबंध करण्याचा अधिनियम, २००५ आपल्या राज्यात लागू करण्यात आला होता. नागरिकांना लोकाभिमुख प्रशासन देण्याकरिता अशासकीय विधेयक २००९ मध्ये मांडण्यात आले. त्यानंतर सन २०१५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, पारित करण्यात आला. हा अधिनियम दिनांक २८ एप्रिल, २०१५ पासून अंमलात आला.

## १.२ अधिनियमाची  वैशिष्ट्ये

देशातील अन्य राज्यांमधील अधिनियमांहून वेगळेपण दिसून येणारा महाराष्ट्र लोकसेवा हक्क  अधिनियम, २०१५ हा एक क्रांतिकारक अधिनियम आहे. डिजिटल मंचाचा उपयोग करून व सार्वजनिक वितरण प्रणालीच्या गुणवत्तेत सुधारणा करणाऱ्या कार्यसंस्कृतीवर सदर अधिनियमात भर देण्यात आला आहे.  पात्र व्यक्तींना लोकसेवांची उपलब्धता ही पारदर्शक व कालबद्ध पद्धतीने  झाली पाहिजे यावर सदर अधिनियमाचा भर आहे. जनतेच्या तक्रारींचे प्रभावी निराकरण करण्याची प्रणाली, सार्वजनिक वितरण प्रणालीची कार्यक्षमता वाढविणे यावर अधिनियमात विशेष भर दिला आहे. लोकसेवेची मागणी करण्याचा हक्क नागरिकांना दिल्यामुळे कार्यक्षम व पारदर्शक पद्धतीने विहित कालावधीत लोकसेवा देण्याचे वैधानिक उत्तरदायित्व शासनावर असल्यामुळे हा अधिनियम म्हणजे पूर्वीच्या कामकाजाच्या पद्धतीत केलेला आमूलाग्र बदलच आहे. लोकसेवा हक्क अधिनियमाच्या कलम ३ नुसार लोकसेवा पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी, सेवेची कालबद्ध मर्यादा हे अधिनियम अंमलात आल्यानंतर तीन महिन्यांमध्ये व त्यानंतर वेळोवेळी अधिसूचित करणे प्रत्येक विभागावर बंधनकारक आहे. त्यानुसार दिनांक ३१.०३.२०१९ पर्यंत एकूण ३१  विभागांपैकी २६  विभागांनी ४८६ सेवा अधिसूचित केल्या आहेत.

## १.३ महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग

विविध सेवा उपलब्ध करण्याबाबत राज्य शासनाच्या विविध विभागांवर संनियंत्रण, नियमन व सुधारणा करण्यासाठी अधिनियमाच्या कलम १३(१) नुसार राज्य शासनाने आयोगाची स्थापना करून दिनांक १ मार्च, २०१७ रोजी मुख्य आयुक्तांची नियुक्ती केली. कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय सेवा देण्यात विलंब झाल्यास विभागाकडे प्रथम व द्वितीय आणि आयोगाकडे तिसरे अपील करता येते.

### १.३.१ कर्तव्ये

अधिनियमानुसार आयोगाला विविध कर्तव्ये व जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या असून अधिनियमाची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्याच्या जबाबदारी सोबतच आयोगाला एक वेगळी ओळख देण्यात आली आहे. अधिनियमाच्या कलम १६ नुसार, अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची व लोकसेवा प्रभावीपणे उपलब्ध होण्याची खबरदारी घेण्यासाठी सूचना करण्याची जबाबदारी आयोगावर सोपविण्यात आली आहे. तसेच सेवा देण्यात अपयशी ठरल्यास स्वतः होऊन दखल घेण्याचे व विभागीय चौकशीची शिफारस करण्याचे, कार्यालयांची तपासणी करण्याचे, सार्वजनिक प्राधिकरणानी अधिसूचित केलेल्या सेवांवर संनियंत्रण ठेवण्याचे व अपिलांवर निर्णय घेण्याचे हक्क आयोगाला बहाल करण्यात आले आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ नुसार दिवाणी न्यायालयाचे हक्क आयोगाला बहाल करण्यात आले आहेत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५मधील कलम १६ नुसार आयोगाच्या शिफारशींवर विचार करून त्यांची अंमलबजावणी करणे राज्य शासनावर बंधनकारक आहे.

### १.३.२ संघटनात्मक संरचना

आयोगाचे कार्यालय मुंबई येथे आहे. आयोगाच्या कार्यालयात ३४ मंजूर पदे आहेत. सद्य स्थितीत एक उपसचिव व चार कक्ष अधिकारी व त्यांचे सहाय्यक असे एकूण २४ अधिकारी / कर्मचारी आयोगाच्या कार्यालयात कार्यरत आहेत. राज्याचे मुख्य सेवा हक्क आयुक्त हे दिनांक १ मार्च २०१७ पासून कार्यरत आहेत.

आकृती १.१ : आयोगाची संरचना



## १.४ सेवा उपलब्ध करून देण्याची पद्धती : आपले सरकार सेवा पोर्टल व मोबाईल ॲप

पात्र व्यक्तींना अधिसूचित सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एक व्यासपीठ (single e - platform) उपलब्ध करून देण्याचे काम आयोगाने प्राधान्याने हाती घेतले. तसेच शासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे महत्त्वाचे कामही आयोगाने " यशदा " मार्फत हाती घेतले. त्यामुळे राज्यात अधिनियमाची कार्यक्षम व प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य झाले. सर्व अधिसूचित सेवा एकाच व्यासपीठावर उपलब्ध करण्यावर आयोगाने भर दिला आहे.

### १.४.१ आपले सरकार सेवा पोर्टल

जनतेला ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आपले सरकार सेवा पोर्टल सुरु करण्यात आले आहे. सद्यस्थितीत ऑनलाईन पद्धतीने सर्वाधिक सेवा उपलब्ध करून देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. सदर सेवांचा लाभ घेण्यासाठी व्यासपीठाचा (single platform) उपयोग होतोच, पण कोणते विभाग कोणत्या सेवा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देतात, त्यांच्याकडे किती अर्ज प्राप्त होतात व त्याची कार्यवाही कशा प्रकारे केली जाते व प्रलंबित अर्जांची संख्या किती आहे, ही माहिती देखील रियल टाईम आधारावर प्राप्त होते. दिनांक ३१.३.२०१९ पर्यंत ६,४४,६५,६६८ अर्ज ऑनलाईन प्राप्त झाले असून ६,२६,०६,६४१ अर्जांवर संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली आहे.

### १.४.२ मोबाईल ॲप

ऑनलाईन सेवांना मिळत असलेला मोठा प्रतिसाद पाहता सेवा अधिकाराशी संबंधित विशेष मोबाईल ॲप जनतेला उपलब्ध करून देण्यात आले आहे. विभागवार उपलब्ध सेवा शोधण्यासाठी आणि आपल्या अर्जाचा पाठपुरावा घेण्याचा मुख्य उद्देश आहे. https://itunes.apple.com/in/app/rts-maharashtra/ or RTS Maharashtra या संकेतस्थळावरून सदर मोबाईल ॲप विनामूल्य डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर मोबाईल ॲपचा उपयोग करून नागरिक ऑनलाईन अर्ज करू शकतात.

## १.५ प्रशिक्षण

अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आणि सेवांची उपलब्धता करण्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत सदर अधिनियमात तरतूद करण्यात आली आहे. प्रशिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन पदनिर्देशित अधिकारी, अपिलीय अधिकारी व अन्य शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये ह्या अधिनियमा बाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांना यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनीच्या (यशदा) माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येते.

### १.५.१ यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी (यशदा) पुणे यांचेकडून प्रशिक्षण

यशदा, पुणे ही महाराष्ट्र शासनाची शिखर प्रशिक्षण संस्था असून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये त्याबाबत जागरुकता निर्माण होण्यासाठी राज्य प्रशिक्षण धोरणाच्या अंतर्गत "दिशानिदेशन प्रशिक्षण" देण्याची कामगिरी सदर संस्थेकडे सोपविण्यात आली आहे. अधिनियम, त्याची उद्दिष्टे व त्याच्या कलमांमधील विविध तरतुदींच्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्हा स्तरावरील सर्व संवर्गांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

**तक्ता १.१ - यशदा यांचेतर्फे जागरुकता प्रशिक्षण कार्यक्रम**
**(२०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९)**

| अनुक्रमांक | वर्ष | प्रशिक्षणार्थीची संख्या |
|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ८४,९३० |
| २ | २०१६-१७ | १,२१,९५१ |
| ३ | २०१७-१८ | १५,१७० |
| ४ | २०१८ – १९ | ९,१९४ |
| **एकूण** | | **२,३१,२४५** |

### १.५.२ तांत्रिक प्रशिक्षण

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत ज्या विभागांच्या सेवा समाविष्ट करण्यात आल्या आहेत, त्या विभागांसाठी महाऑनलाईन तर्फे जिल्हानिहाय प्रशिक्षण सत्रे भरविण्यात आली आहेत. आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲप यांच्या उपयोगाबाबत विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

महाऑनलाईन हा महाराष्ट्र शासन व टाटा सल्लागार सेवा (टी.सी.एस.) यांचा संयुक्त उपक्रम आहे. त्यांचे जिल्हा समन्वयक पोर्टलचे ज्ञान संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना देतात व त्यामध्ये नागरिकांकडून विभागाला प्राप्त झालेल्या अर्जांची कार्यवाही कशी करायची, सेवा कशी उपलब्ध करून द्यायची किंवा योग्य कारणासह नामंजूर करणे, अपीलांची ऑनलाईन कार्यवाही कशी करायची, मागोवा कसा घ्यायचा व त्याची पडताळणी कशी करायची याचा कार्यप्रवाह सुद्धा विशद करून सांगितला जातो.

### तक्ता १.२ महाऑनलाईन द्वारा तांत्रिक प्रशिक्षण

| अनुक्रमांक | वर्ष | प्रशिक्षणार्थीची संख्या |
|---|---|---|
| १ | २०१५-१८ | १०,२७५ |
| २ | २०१८-१९ | ७,९०० |
| एकूण | | **१८,१७५** |

## १.६ महाराष्ट्र  राज्य लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रवासावर एक दृष्टिक्षेप

### १.६.१ अधिनियम व अधिसूचना

महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर  महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या राजपत्रामध्ये अधिनियम प्रसिद्ध करण्यात आला. अधिनियम दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी अंमलात आला व नियम दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजी प्रकाशित करण्यात आले. अधिनियमाच्या अंतर्गत पात्र व्यक्तींसाठी कोणत्या लोकसेवा उपलब्ध  आहेत हे तीन महिन्यांमध्ये अधिसूचित करणे सर्व शासकीय विभागांना बंधनकारक आहे. त्यानुसार विविध विभागांनी अधिसूचित सेवांची यादी पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी व प्रत्येक सेवा  उपलब्ध करून  देण्यासाठी कालमर्यादा यांची पहिली यादी प्रकाशित केली.

### १.६.२ महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे गठन

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाचे माजी मुख्य सचिव, श्री. स्वाधीन क्षत्रिय (भा. प्र. से.—सेवानिवृत्त) यांनी दिनांक १ मार्च, २०१७ रोजी राज्याचे पहिले मुख्य लोकसेवा हक्क  आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला.

### १.६.३ ऑनलाईन सेवा

आपले सरकार  पोर्टल व मोबाईल ॲप   यांच्याद्वारे ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महाऑनलाईन यांनी आज्ञावली विकसित केली असून विविध विभागांना त्यांची संकेतस्थळे आपले सरकार सेवा पोर्टलशी जोडून घेण्यास (Integration) सूचित करण्यात आले होते. दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंत ६,४४,६५,६६८  अर्ज ऑनलाईन प्राप्त झाले आहेत. ४८६ अधिसूचित सेवांपैकी ४०६ सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत. उर्वरित ८० सेवांसाठीची आज्ञावली विकसित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

### १.६.४ जिल्हा आढावा बैठका

अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व त्यामधील अडचणी समजून घेण्यासाठी आयोगाने नागपूर, चंद्रपूर, वर्धा व पुणे येथे भेटी दिल्या. जिल्हाधिकारी व सर्व जिल्हा स्तरीय विभाग प्रमुख यांच्या सोबत आढावा बैठका घेण्यात आल्या. तसेच जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख यांच्या सोबत आढावा बैठका घेण्यात आल्या. या भेटींच्या दरम्यान आयोगाने आपले सरकार सेवा केंद्रांना भेटी देऊन नागरिकांशी सुद्धा संवाद साधला. राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्तांनी तहसील कार्यालये, ग्राम पंचायतींची कार्यालये, जमाबंदी आयुक्त कार्यालय, मुद्रांक व नोंदणी महानिरीक्षक कार्यालय व नागरिक सुविधा केंद्रांना भेटी दिल्या. सर्व महसुली विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांची दृकभाष (video conferencing) परिषद घेण्यात आली.

### १.६.५ शासकीय विभागांच्या सचिवांच्या सोबत आढावा बैठका

अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयोगाने शासनाच्या विविध विभागांच्या सचिवांबरोबर नियमित आढावा बैठकांच्या द्वारे वेळोवेळी संवाद साधला आहे.

## तक्ता १.३ विविध विभागांच्या आढावा बैठकांचा तपशील

| विभाग | आढावा दिनांक |
|---|---|
| गृह, सामान्य प्रशासन, महसूल, नगर विकास, कामगार, माहिती व तंत्रज्ञान, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, शालेय शिक्षण व क्रीडा, उर्जा, ग्राम विकास, सार्वजनिक आरोग्य | ४ एप्रिल २०१८ |
| पाणीपुरवठा व स्वच्छता, महसूल, सहकार, कौशल्य व उद्योजकता विकास, कामगार, शिक्षण व क्रीडा, माहिती तंत्रज्ञान, आदिवासी विकास, उर्जा, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, वैद्यकीय शिक्षण, परिवहन, गृह, अन्य मागासवर्ग, विधी व न्याय, उच्च व तंत्र शिक्षण, सार्वजनिक बांधकाम विभाग | ८ जून २०१८ |
| सामान्य प्रशासन विभाग, उद्योग विभाग, महसूल विभाग, कामगार विभाग, गृह विभाग, उर्जा, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य , पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय, उच्च व तांत्रिक शिक्षण, जलसंपदा, अन्न व नागरी पुरवठा, | २३-२४ ऑगस्ट २०१८ |
| आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्यांक विभाग, ग्राम विकास विभाग, महिला व बालकल्याण विभाग, विधी व न्याय, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, कृषी विभाग | २२-२४ ऑक्टोबर २०१८ |
| सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग | २ जानेवारी २०१९ |

### १.६.६ सर्व जिल्हाधिकाऱ्यांबरोबर दृकभाष (व्हिडियो कॉन्फरंसिंग) संवाद

दिनांक १२ मार्च २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व जिल्हाधिकारी यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून पदनिर्देशित करण्यात आले आहे. आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधून अधिनियमाच्या परिणामकारक अंमलबजावणीवर भर दिला व अधिसूचित सेवा विहित कालावधीत पुरविण्याचे निर्देश दिले. तसेच प्रथम व द्वितीय अपिलांचा निपटारा वेळेवर करण्यावर आयोगाने अधिक भर दिला.

### १.६.७ विविध कार्यालयांना भेटी व आढावा

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीशी संबंधित बाबी, प्राप्त अर्जांची संख्या व विहित कालमर्यादेत त्यांची कार्यवाही, विहित कालमर्यादेत कार्यवाही करताना येणाऱ्या अडचणी, अर्जाच्या नमुन्यांची क्लिष्टता कमी करणे व सर्व स्तरांवर ऑनलाईन सेवांच्या योग्य कामकाज प्रक्रियेचा नियमित आढावा घेण्यात आला.

## तक्ता १.४ आढावा बैठकांचे दिनांक

| विभाग | आढावा दिनांक |
|---|---|
| गृह, सामान्य प्रशासन, महसूल, नगर विकास, कामगार, माहिती तंत्रज्ञान, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य , शालेय शिक्षण व क्रीडा, उर्जा, ग्राम विकास, सार्वजनिक आरोग्य | ०४ एप्रिल २०१८ |
| सर्व विभागांचा आढावा | ८ जून २०१८ |
| सामान्य प्रशासन विभाग, उद्योग विभाग, महसूल विभाग, कामगार विभाग, गृह विभाग, उर्जा, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य , पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय, उच्च व तांत्रिक शिक्षण, जलसंपदा, अन्न व नागरी पुरवठा | २३-२४ ऑगस्ट २०१८ |
| आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्यांक विभाग, ग्राम विकास विभाग, महिला व बालकल्याण विभाग, विधी व न्याय, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, कृषी विभाग | २२-२४ ऑक्टोबर २०१८ |
| आपले सरकार पोर्टल मध्ये सुधारणा करण्याबाबत बैठक | १७ डिसेंबर २०१८ |
| सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, महाऑनलाईन | २ जानेवारी २०१९ |
| नगर विकास विभागाच्या सर्व अधिसूचित सेवांचे आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण | २३ जानेवारी २०१९ |
| पुणे जिल्हा परिषदेच्या २०० अधिसूचित सेवा राज्यव्यापी करण्याबाबत बैठक | २४ जानेवारी २०१९ |

## तक्ता १.५ आढावा बैठकांचे दिनांक

| आढावा / क्षेत्र भेटी | दिनांक |
|---|---|
| पुणे येथे नागरीक व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सोबत संवाद | ७ एप्रिल २०१८ |
| सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याशी दृकभाष (Video Conferencing) संवाद | ५ जून २०१८ |
| पुणे जिल्हा परिषदेने कार्यान्वित केलेल्या २०० सेवांचे उद्घाटन | ११ ते १३ जुलै २०१८ |
| जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचे कार्यालयात आढावा | ११ ते १३ जुलै २०१८ |
| नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांचे कार्यालयात आढावा | ११ ते १३ जुलै २०१८ |
| पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयास भेट | ११ ते १३ जुलै २०१८ |
| नागपूर विभागातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व महानगरपालिकांच्या आयुक्तांशी दृकभाष (Video Conferencing) संवाद | ६ ऑगस्ट २०१८ |
| वरोरा तहसील कार्यालय, चंद्रपूर येथे आढावा बैठक | ६ ऑगस्ट २०१८ |
| आनंदवन ग्रामपंचायत कार्यालय, चंद्रपूर येथे भेट व आढावा | ६ ऑगस्ट २०१८ |
| जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे आढावा बैठक | ६ ऑगस्ट २०१८ |
| चंद्रपूर महानगरपालिका येथे आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन | ६ ऑगस्ट २०१८ |
| आपले सरकार सेतू केंद्र, चंद्रपूर येथे नागरिकांशी संवाद | ७ ऑगस्ट २०१८ |
| **वर्धा**<br>१) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे आढावा बैठक<br>२) जिल्हा रुग्णालय , वर्धा येथील आपले सरकार सेवा केंद्र आणि सेतू केंद्राला भेट | ८ ऑगस्ट २०१८ |
| प्रशिक्षणार्थी यांच्याशी संवाद | ४ ऑक्टोबर २०१८ |
| महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग | १० डिसेंबर २०१८ |
| यशदा , पुणे येथे बैठक | २१ डिसेंबर २०१८ |
| लोणावळा नगरपालिकेत आढावा बैठक | २४ डिसेंबर २०१८ |
| भवन्स महाविद्यालय , मुंबई येथे विद्यार्थ्यांचे जागरूकता शिबीर | ८ जानेवारी २०१९ |
| मुंबई जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक | ११ जानेवारी २०१९ |
| के. सी. विधी महाविद्यालय, मुंबई येथे विद्यार्थ्यांची कार्यशाळा | ३१ जानेवारी २०१९ |

कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयोगाने, शासकीय विभाग, विभागीय व जिल्हा स्तरावरील नोडल अधिकारी, आणि विद्यार्थी व नागरिकांशी संवाद साधून सर्वंकष आढावा घेतला आहे. आयोगाच्या उपक्रमांवर खालील तक्त्यामध्ये दृष्टिक्षेप टाकला आहे:

**तक्ता क्रमांक २.१ : आयोगाने घेतलेल्या बैठका, भेटी व चर्चासत्रे**

| | | |
|---|---|---|
| १ | बैठका | विभागांच्या सचिवांच्या बरोबर बैठका |
| | | विभागीय व जिल्हा स्तरावरील बैठका |
| २ | भेटी | जिल्हा परिषद |
| | | तहसील कार्यालये |
| | | महानगरपालिका |
| | | जिल्हाधिकारी कार्यालये |
| | | नागरिक सुविधा केंद्र |
| | | जमाबंदी आयुक्त कार्यालय |
| | | आपले सरकार सेवा केंद्र |
| | | नोंदणी महानिरीक्षक कार्यालय |
| | | ग्राम पंचायत |
| | | सेतू केंद्र |
| ३ | नागरिक व विद्यार्थी यांच्याशी संवाद | पुण्यातील नागरिकांशी सुसंवाद |
| | | के .सी . विधी महाविद्यालय , मुंबई |
| | | नागपूर, चंद्रपूर व वर्धा येथील आपले सरकार सेवा केंद्रांना भेटी |
| | | भवन्स कॉलेज , मुंबई |
| | | महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग येथील कार्यक्रम |
| | | विधी प्रशिक्षणार्थी यांच्याशी सुसंवाद |
| ४ | आढावा बैठका | नियमितपणे घेतल्या |
| ५ | बोधचिन्ह व घोषवाक्य | आयोगाचे बोधचिन्ह व घोषवाक्य यांचे अनावरण |

## २.२ आयोगाचे बोधचिन्ह व घोषवाक्य

आयोग हे अधिनियमाच्या द्वारे प्रस्थापित प्राधिकरण असल्यामुळे त्यास वैधानिक दर्जा आहे. सार्वजनिक ठसा उमटविण्यासाठी आयोगाचे उपक्रम व महत्व प्रतिबिंबित करणारे स्वत:चे असे एक बोधचिन्ह व घोषवाक्य असणे आवश्यक आहे. नागरिकांकडून खुल्या स्पर्धेद्वारे प्राप्त प्रवेशिका यांच्यामधून आयोगाने बोधचिन्ह व घोषवाक्याची निवड केली आहे. घोषवाक्यासाठी २४४ प्रवेशिका व बोधचिन्हासाठी १८२ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. मुख्य लोकसेवा हक्क आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील गठीत समितीने सर्वोत्तम घोषवाक्य व बोधचिन्हाची निवड केली. सर्वोत्तम घोषवाक्य व बोधचिन्ह सादर करणाऱ्या नागरिकांचा

माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना प्रत्येकी रु २५,००० चे पारितोषिक प्रदान करण्यात आले. “ आपली सेवा  आमचे कर्तव्य “  ह्या घोषवाक्याची निवड करण्यात आली.



**सर्वोत्कृष्ट बोधचिन्हासाठी श्री नरेश अग्रवाल यांचा सत्कार करताना मा . मुख्यमंत्री**



**सर्वोत्कृष्ट घोषवाक्यासाठी श्री हेमंत कानडे यांचा सत्कार करताना मा. मुख्यमंत्री**

## २.३ दृकभाष (video conferencing) परिषद

दिनांक १२ मार्च २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व जिल्हाधिकारी यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून पदनिर्देशित करण्यात आले. त्यामुळे आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधून अधिनियमाच्या परिणामकारक अंमलबजावणीवर भर दिला व अधिसूचित सेवा विहित कालावधीत पुरविण्याचे निर्देश दिले. तसेच प्रथम व द्वितीय अपिलांचा निपटारा वेळेवर करण्यावर आयोगाने अधिक भर दिला.

## २.४ विद्यार्थ्यांना देण्यात आलेले प्रशिक्षण

लोकसेवा हक्क अधिनियमाचे प्रभावी प्रवर्तन व योग्य अंमलबजावणी होण्यासाठी आयोगाने अनेक पाउले उचलली आहेत. उपलब्ध सेवांबाबत सर्वसामान्य जनतेला अधिक माहिती होण्यासाठी व त्याबाबत अधिक जागरूकता निर्माण होण्यासाठी विविध महाविद्यालयांमध्ये कार्यशाळा घेणे हे असेच एक पाऊल होते. सर्वसामान्य जनतेत अधिसूचित सेवांच्या बाबत जागृती करणारे विद्यार्थी तयार करण्यासाठी आयोगाने के. सी. विधी महाविद्यालयात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेतली होती. विद्यार्थ्यांच्या मध्ये जागृती निर्माण करणे व पात्र व्यक्तींनी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून सेवांचा लाभ घेण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यास आयोगाला त्यांनी साहाय्य करावे, हे दिनांक ३१ जानेवारी २०१९ रोजी घेतलेल्या शिबिराचे उद्दिष्ट होते. तसेच अधिसूचित केलेल्या ४८६ सेवांचा कसा लाभ घ्यावा याबाबत सर्वसामान्य जनतेत जागरूकता कशी निर्माण करता येईल याचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट होते.



**पब्लिक कंन्सर्न फ़ॉर गव्हर्नंस ट्रस्टच्या प्रशिक्षणार्थीच्या सोबत श्री रिबेरो व मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त**

कार्यशाळा तीन सत्रांमध्ये विभागण्यात आली. त्यामध्ये प्रथमतः मुख्य लोक सेवा हक्क आयुक्तांचे मार्गदर्शन व त्यानंतर आयोगाच्या उपसचिवांचे लोक सेवा हक्क अधिनियम २०१५ मधील तरतुदी व प्रक्रिया यावरील सत्र झाले. दुसऱ्या तांत्रिक सत्रात अधिनियमाच्या अंमलबजावणी बाबत महाऑनलाईनच्या

मुख्य परिचालन अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रश्नोत्तरे व शंकानिरसनाचे तिसरे सत्र होऊन कार्यशाळेचा समारोप झाला. या कार्यशाळेत २२१ विद्यार्थी सहभागी होते.

प्रशिक्षणाच्या शेवटी सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी प्रत्येकी १० विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याच्या व प्रशिक्षित केलेल्या अशा विद्यार्थ्यांनी समाजातील कुटुंबांशी संपर्क साधून लोकसेवा हक्क कायद्याबाबत जागरुकता निर्माण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करण्यासाठी एक महिन्यानंतर सर्वेक्षण करण्यात आले. सदर सर्वेक्षणात ९ महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले. सदर विद्यार्थ्यांनी १२,११५ कुटुंबांचे सर्वेक्षण केले. प्रतिसाद दिलेल्या पैकी ७२% कुटुंबांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची माहिती असल्याचे सर्वेक्षणात दिसून आले. तसेच शासकीय विभागांकडून सेवा प्राप्त करून घेण्यात ७०% व्यक्तींना कोणत्याही अडचणी आल्या नसल्याचे सुद्धा सर्वेक्षणात आढळून आले.

## २.५ आढावा बैठका

**विविध बैठका घेऊन आयोगाने अधिनियमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.**

| विषय | दिनांक |
|---|---|
| लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीचा आढावा | ४ एप्रिल २०१८ |
| सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी व विभागीय आयुक्तांशी व्हिडियो कॉन्फरंसिंग | ५ जून २०१८ |
| लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीचा आढावा | ८ जून २०१८ |
| आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा आढावा | २३-२४ ऑगस्ट २०१८ |
| आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा आढावा | २१-२४ ऑक्टोबर 2018 |
| आपले सरकार पोर्टलचा आढावा | १७ डिसेंबर २०१८ |
| आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा आढावा | २ जानेवारी २०१९ |
| नगर विकास विभागाच्या सर्व अधिसूचित सेवांचे आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण (integration) | २३ जानेवारी २०१९ |
| पुणे जिल्हा परिषदेच्या २०० अधिसूचित सेवा राज्यभरात लागू करण्याबाबत बैठक | २४ जानेवारी २०१९ |

## २.६ विविध विभागांच्या आढावा बैठकांचा तपशील

| विभाग | आढावा दिनांक |
|---|---|
| गृह, सामान्य प्रशासन, महसूल, नगर विकास, कामगार, माहिती तंत्रज्ञान, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य ,शालेय शिक्षण व क्रीडा, उर्जा, ग्राम विकास, सार्वजनिक आरोग्य विभाग | ४ एप्रिल २०१८ |
| पाणीपुरवठा व स्वच्छता, महसूल, सहकार, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, शिक्षण व क्रीडा, माहिती तंत्रज्ञान, आदिवासी विकास, उर्जा, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, वैद्यकीय शिक्षण, परिवहन, गृह, इतर मागासवर्ग, विधी व न्याय, उच्च व तंत्र शिक्षण, सार्वजनिक बांधकाम विभाग | ८ जून २०१८ |
| सामान्य प्रशासन विभाग, उद्योग विभाग, महसूल विभाग, कामगार विभाग, गृह विभाग,उर्जा,सार्वजनिक आरोग्य, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य ,पशुसंवर्धन, दुग्ध | २३-२४ ऑगस्ट २०१८ |

| | |
|---|---|
| व मत्स्य व्यवसाय, उच्च व तांत्रिक शिक्षण, जलसंपदा, अन्न व नागरी पुरवठा विभाग , | |
| आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्यांक विभाग, ग्राम विकास विभाग, महिला व बालकल्याण विभाग, विधी व न्याय, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, कृषी विभाग | २२-२४ ऑक्टोबर २०१८ |
| सामान्य प्रशासन विभाग , माहिती तंत्रज्ञान विभाग | २ जानेवारी २०१९ |



**पुणे जिल्हा परिषदेच्या २०० सेवांचे उद्घाटन**




**पुण्यातील नागरिक व बिगर शासकीय संघटनांशी संवाद**



आनंदवन येथे डॉ. विकास आमटे यांच्यासोबत बैठक




आनंदवन ग्रामपंचायतीला भेट



**चंद्रपूर जिल्ह्यात आपले सरकार सेवा केंद्र यशस्वीरीत्या चालवणाऱ्या बचत गटांच्या महिलांच्या सोबत जिल्हाधिकारी चंद्रपूर व राज्य मुख्य लोकसेवा आयुक्त**



**वरोरा येथील आपले सरकार सेवा केंद्रावर नागरिकांशी चर्चा**



वरोरा येथील उपविभागीय कार्यालयातील सूचना फलकाची पाहणी करताना



वरोरा येथील उपविभागीय कार्यालयात देण्यात येणाऱ्या लोकसेवांचा आढावा




**जिल्हा रुग्णालय वर्धा येथे आपले सरकार सेवा केंद्राला भेट**



**जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा येथे आढावा बैठक**




जिल्हा सेतू केंद्र वर्धा येथे भेट



जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर येथे आढावा बैठक



लोणावळा नगर परिषदेला दिलेल्या भेटीत तेथील माननीय नगराध्यक्ष व मुख्य अधिकारी यांच्या सोबत



जमाबंदी आयुक्त व नोंदणी महानिरीक्षक यांच्यासोबत आढावा बैठक




**भवन्स महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**






**के.सी.विधी महाविद्यालय, मुंबई येथे कार्यशाळा**

# प्रकरण ३: आपले सरकार सेवा पोर्टल व मोबाईल ॲप

## ३.१ आपले सरकार सेवा  पोर्टल बाबतची माहिती :

नागरिकांना संगणक किंवा मोबाईल ॲपचा वापर करून तसेच राज्यातील ३०,८७८ आपले सरकार सेवा केंद्रांचा उपयोग करून शासनाच्या विविध विभागांकडे अर्ज सादर करुन  सेवा प्राप्त करण्यासाठी आपले सरकार पोर्टल आहे. ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲपवर मराठी व इंग्रजीत उपलब्ध करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व विहित कालावधीत लोकसेवा उपलब्ध होण्यासाठी व शासनाचे विविध विभाग व सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व येण्यासाठी महाराष्ट्र शासनाने लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मध्ये पारित केला.




आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲपद्वारे नागरिक खालील लाभ करून घेऊ शकतात.

- नागरीक स्वत:ची ऑनलाईन ओळख (self profile ) निर्माण करू शकतात. एकदा स्वत:ची ओळख निर्माण केल्यावर उपयोगकर्ता त्याच ओळखीचा उपयोग करून आवश्यकतेनुसार सर्व अधिसूचित सेवा प्राप्त करण्यासाठी अर्ज करू शकतात.
- सदर पोर्टलचा उपयोग करून नागरिक सेवा शुल्क प्रदान तसेच दस्तऐवज सुद्धा अपलोड करू शकतात.
- ग्राहकाने नोंदणी केलेल्या ओळखखात्यात अंतिम प्रमाणपत्र जमा करण्यात येते व त्याची प्रत डिजिटल लॉकरमध्ये अग्रेषित करण्यात येते.

- नागरिक सदर ऑनलाईन पोर्टलवर आपल्या अर्जाचा मागोवा घेऊ शकतात.
- आपले सरकार सेवा पोर्टलकडून प्राप्त झालेल्या कोणत्याही ऑनलाईन प्रमाणपत्राची कोणीही त्रयस्थ व्यक्ती पडताळणी करू शकते.
- अर्जासाठी क्रमांक व पावती त्वरित प्राप्त होते.

### ३.१.१ ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा

नागरीक स्वतः ऑनलाईन अर्ज करून अधिसुचित सेवा प्राप्त करू शकतात. त्याकरिता https ://aaplesarkar.mahaonline.gov.in या पोर्टलचा वापर करता येतो. ज्या नागरिकांना स्वतः ऑनलाईन अर्ज करणे शक्य नाही, त्यांना मदत करण्यासाठी राज्यात ३०,८७८ आपले सरकार सेवा केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. दिनांक मार्च २०१९ पर्यंत १९,५०,८२३ नागरिकांनी ऑनलाईन अर्ज प्राप्त करून सेवा प्राप्त केल्या आहेत.

### ३.१.२ प्रक्रिया सुलभीकरण ( Process Re-engineering )

अधिसूचित सेवा नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यासाठी प्रक्रियांचे सुलभीकरण आवश्यक असते. विविध विभाग व महाऑनलाईन यांनी एकत्र येऊन ही सुलभीकरणाची प्रक्रिया पूर्ण केली.

### ३.१.३ डिजिटल कार्यप्रवाह

सर्व विभागांचा कामकाजाचा प्रवाह डिजिटल स्वरुपात केला असून यात कुठेही मानवी हस्तक्षेप नाही. उदाहरणार्थ, नागरिकाने उत्पन्न दाखला प्राप्त करण्यासाठी अर्ज सादर केला असल्यास, संपूर्ण कार्यप्रवाह हा डिजिटल स्वरूपाचा असेल व अर्जाच्या विविध टप्प्यांचा प्रवास इलेक्ट्रॉनिक पद्धतीचा राहील. आपला अर्ज कोणत्या टप्प्यावर आहे, याची नागरिक ऑनलाईन तपासणी करू शकतील. अर्जदाराला आपल्या प्रलंबित अर्जाची सद्यस्थिती पाहता येईल.

- <u>मुखपृष्ठ</u>—aaplesarkar.mahaonline.gov.in**या** संकेतस्थळाच्या मुखपृष्ठाची माहिती

  - <u>भाषा बदलण्याचा पर्याय ( मराठी / इंग्जी )</u>
  - लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत उपलब्ध सेवांचा तपशील,
  - अधिप्रमाणनासाठी प्राप्त मंजूर अर्जाची पडताळणी करणे
  - नागरिक त्यांच्या अर्जाच्या स्थितीचा मागोवा घेऊ शकतात.



**आपले सरकार पोर्टल वर आपल्या अर्जाचा मागोवा घ्या-** अर्जदार त्यांच्या अर्जाच्या स्थितीचा मागोवा घेऊ शकतात. प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करताना प्राप्त झालेला अर्जाचा ओळख क्रमांक तिथे प्रविष्ट करा. सदर वैध अर्ज ओळख क्रमांक प्रविष्ट केल्यावर आपले लॉग इन तपशील न वापरता आपल्या अर्जाची स्थिती अर्जदाराला ऑनलाईन समजू शकते :




सर्व तपशील प्रविष्ट केल्यावर अर्जाचा अधिकृत तपशील व त्याची स्थिती आपोआप दिसू लागेल




आपले सरकार पोर्टल वरून अधिप्रमाणित प्रमाणपत्राची सत्यता पडताळून घ्या – कोणताही त्रयस्थ पक्षकार आपले सरकार वरून ऑनलाईन प्राप्त प्रमाणपत्र त्याच्या अधिप्रमाणन व वैधतेसाठी सत्यता पडताळणी करू शकतो. पडताळणीच्या प्रक्रियेत उपयोगकर्त्याने सत्यता पडताळणी खिडकीत विभागाचे नाव, प्रमाणपत्रावरील बारकोड क्रमांक प्रविष्ट करून submit वर क्लिक करावे.

सर्व तपशील सादर केल्यावर अधिप्रमाणित प्रमाणपत्राचा तपशील आपल्या सत्यता पडताळणी करण्यासाठी दिसू शकेल.




लोकसेवा हक्क आयोगाबाबत – यामध्ये लोकसेवा हक्क आयोगाबाबत थोडक्यात माहिती देण्यात आली असून नागरीक महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ व त्याअंतर्गत नियम येथून डाऊनलोड करु शकतील.



<u>**विभागांकडून अधिसूचित करण्यात आलेल्या सेवा**</u>—विहित कालावधी, पदनिर्देशित अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची माहिती नागरिक डाउनलोड करु शकतात.



अधिसूचना प्रसिध्द केलेले विभाग

अधिक माहितीसाठी विभागाच्या नावावर क्लिक करा

वन विभाग

| Sr. No. | Department | Public Service | Time limit for providing Service (Days) | Designated Officer | First Appellate Officer | Second Appellate Officer | Services available in Aaple sarkar |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वन विभाग | तेंदू व्यापारी/उत्पादकांची नोंदणी | १० | उपवनसंरक्षक | संबंधीत उपवनसंरक्षक | अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज सनियंत्रण व मूल्यांकन) | Yes |
| २ | वन विभाग | बांबू पुरवठ्यासाठी बुरूड समाजाची नोंदणी | १५ | संबंधित उपवनसंरक्षक (प्रादेशिक) | संबंधीत मुख्य उपवनसंरक्षक (प्रादेशिक) | अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संसाधन उपयोग) | Yes |
| ३ | वन विभाग | वन्यप्राण्यांमुळे मारल्या गेलेल्या गुरांसाठी मंजूर करायची नुकसान भरपाई | १५ | संबंधित वनपरिक्षेत्राचे प्रभारी सहायक वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव) वनप्रकल्प विभाग अंतर्गत संबंधित वनपरिक्षेत्राचे वनक्षेत्राचे प्रभारी सहायक व्यवस्थापक | संबंधित उपवनसंरक्षक/विभागीय वनअधिकारी (प्रादेशिक वन्यजीव) वनसंरक्षक (वन्यजीव) विभागीय व्यवस्थापक संबंधित वनप्रकल्प विभाग,महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादीत | संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक वन्यजीव) व्याघ्र प्रकल्प क्षेत्राचे क्षेत्र संचालक. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाव्यवस्थापक,संबंधित प्रदेश,महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादीत | Yes |

## ३.१.४ आपले सरकार सेवा पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी टप्पे




**अ)** नवीन युजर ? येथे नोंदणी करा...” जोडणीला क्लिक करावे

**ब)** वापरकर्त्याचे नाव व संकेतशब्द नोंदणी करण्यासाठी दिलेल्या पर्यायांपैकी एका पर्यायाची निवड करावी. म्हणजेच **आधार क्रमांकाची पडताळणी** करून घेऊन <u>किंवा **अर्जदाराने संपूर्ण माहिती भरून** आपली ओळख तयार करावी.</u>




**क)** पर्याय १ – आपला आधार क्रमांक द्यावा

किंवा

पर्याय क्रमांक २- खालील सहा टप्प्यांमध्ये नोंदणी अर्ज भरावेत

## पहिला टप्पा – अर्जदाराचे तपशील




## दुसरा टप्पा – अर्जदाराचा पत्ता




## तिसरा टप्पा – मोबाईल क्रमांक व वापरकर्ता नावाचीपडताळणी




## चौथा टप्पा – छायाचित्र अपलोड करावे



## पाचवा टप्पा -ओळखीचा पुरावा (कोणताही एक)




## सहावा टप्पा - पत्त्याचा पुरावा (कोणताही एक )



**ड)** कर्ता नाव व संकेतशब्दाचा उपयोग करून लॉग इन केल्यावर डाव्या बाजूस आपणास कृषी, गृह, उद्योग, ऊर्जा, कामगार इत्यादी विभागांची नावे दिसतील. सदर विभागांपैकी एकाची निवड केल्यावर वापरकर्त्याला त्या विभागाच्या उपलब्ध लोकसेवांची यादी दिसेल.




**इ)** अर्जदारांना विहित कालावधीत सेवा न पुरविल्यास किंवा न्यायोचित कारणाशिवाय अर्ज नामंजुर केल्यास, आपले सरकार पोर्टलद्वारे विभागाने विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडे प्रथम आणि दुसरे अपिल करु शकतात. तिसरे व शेवटचे अपिल आयोगाकडे दाखल करु शकतात.

वर नमूद केलेले सर्व अपील ऑनलाईन प्रणालीचा वापर करुन दाखल केले जाऊ शकतात.

## ३.२ आपले सरकार सेवा पोर्टल व मोबाईल ॲपची माहिती

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार अधिसूचित लोकसेवेचा लाभ घेण्यासाठी आरटीएस महाराष्ट्र नावाचे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. नागरीक ऑनलाईन अर्ज करू शकतात, आपल्या अर्जाची स्थिती जाणून घेऊ शकतात. त्यामुळे आपले सरकार पोर्टल हे नागरिकांना उपयुक्त ॲप्लीकेशन झाले असून नागरिकांना कधीही व कोणत्याही ठिकाणी सेवा प्राप्त होऊ शकते. मोबाईल ॲप शिवाय सुद्धा मोबाईल ब्राऊसिंगच्या सोप्या पद्धतीने नागरिक आपल्या अर्जाचा मागोवा घेऊ शकतात. आरटीएस महाराष्ट्र, ॲण्ड्रॉइड व आयफोन प्रणालीमध्ये इंग्रजी व मराठी या दोन भाषांमध्ये विनामूल्य उपलब्ध आहे.

### ३.२.१ भाषा निवडा

लोकसेवा हक्क अधिनियमाच्या उपयोजनेच्या मोबाईल ॲप किंवा आपले सरकार पोर्टल वापरताना सुरवातीलाच अर्जदाराला इंग्रजी किंवा मराठी भाषा निवडण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

### ३.२.२ डॅशबोर्ड  व ऑनलाईन सेवांची यादी

यामध्ये लोकसेवा हक्क अधिनियम, विभागांची यादी व अधिनियमाच्या अंतर्गत उपलब्ध सेवांची माहिती लोकसेवा हक्क मोबाईल ॲपमध्ये देण्यात आली आहे.

**भाषा निवडा**




**डॅशबोर्ड**




**सेवांचा उप संवर्ग**




### ३.२.३ उप संवर्गाचे तपशील

येथे प्रत्येक सेवेची माहिती देण्यात आली आहे. यामध्ये त्यासाठीची कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकाऱ्याचे पदनाम, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकाऱ्याचे पदनाम व अर्जासोबत जोडणे आवश्यक असलेल्या दस्तऐवजाची यादी देण्यात आली आहे.

**उप संवर्गाचे तपशील**




### ३.२.४ लॉग इन व नोंदणी

मोबाईल ॲपद्वारे वापरकर्ता दोन पद्धतीने नोंदणी करू शकतो. एक म्हणजे आधार क्रमांक किंवा नोंदणी तपशिलाच्या द्वारे.

लॉग इन




आधार क्रमांक




नोंदणी




### ३.२.५ मागोवा घ्या / पडताळणी करा / संपर्क साधा

ऑनलाईन पोर्टलद्वारे वापरकर्ता आपल्या अर्जाचा मागोवा घेऊ शकतो किंवा त्रयस्थ व्यक्ती आपले सरकार सेवा पोर्टल कडून प्राप्त प्रमाणपत्राची पडताळणी करू शकते.

## मागोवा घ्या




## पडताळणी करा




## संपर्क साधा



## ३.२.६ फायदे







## ३.२.७ अर्जदाराने केलेल्या अर्जांची माहिती

पूर्वीचे व्यवहार या पर्यायाद्वारे वापरकर्ता आपल्या पूर्वीच्या अर्जांची माहिती व सद्यस्थिती पाहू शकतो.







लोकसेवांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याच्या प्रमाणात झपाट्याने वाढ होत असल्याचे चित्र उत्साहवर्धक आहे. आपले सरकार सेवा केंद्रांच्या माध्यमातून दिनांक ३१.०३.२०१९ पर्यंत १९,५०,८२३ अर्जदारांनी स्वतःची नोंदणी केली असून स्वतःची ओळख ( self profile ) तयार केली आहे व लोकसेवा

सुविधेचा लाभ घेण्यासाठी  ६,४४,६५,६६८ अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम ७ नुसार राज्य शासन सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून विहित कालमर्यादेत लोकसेवांचे वितरण करण्यासाठी प्रोत्साहित करील. या तरतुदींची अंमलबजावणी करण्याबाबत आयोगाची आग्रही भूमिका आहे.

## ४.१ प्रशिक्षण व क्षमता बांधणी

कोणतेही नवीन धोरण किंवा तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करताना प्रशिक्षण अतिशय महत्वाचे असते. त्यामुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांना कार्यक्षमतेने काम करणे सोपे जाते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम २०(४) नुसार अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पदनिर्देशित अधिकारी व अपिलिय अधिकाऱ्यांना नियमित प्रशिक्षण देण्याची गरज विहित करण्यात आली आहे. तसेच शासन प्रशिक्षणासाठी आवश्यक तरतुदी करील असे देखिल अधिनियमात नमुद केले आहे. सर्व अधिकाऱ्यांच्या आधारभूत प्रशिक्षणात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांचे प्रशिक्षण हा त्यांच्या अभ्यासक्रमाचा एक अविभाज्य भाग असेल असे ठरविण्यात आले आहे. त्यामुळे अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षण हा महत्वाचा घटक आहे.

## ४.२ यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) तर्फे प्रशिक्षण

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे ही महाराष्ट्र राज्य शासनाची शिखर प्रशिक्षण संस्था आहे.यशदा सन २०११ पासून राज्याचे प्रशिक्षण धोरण अंमलात आणीत असून त्याद्वारे प्रादेशिक प्रशासन प्रशिक्षण संस्था व जिल्हा प्रशासन प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून विविध प्रशिक्षण कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

### ४.२.१ जागरुकता प्रशिक्षण टप्पा – १ (२०१५-१६)

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंमलात आल्यावर शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये त्याबाबत जागरूकता निर्माण करण्याची जबाबदारी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांच्याकडे सोपविण्यात आली होती. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ “दिशानिदेशन प्रशिक्षण कार्यक्रम” या नावाने एक प्रशिक्षण कार्यक्रम आखून त्याची युद्धपातळीवर अंमलबजावणी करण्यात आली आहे.

प्रशिक्षणाच्या गरजांचे विश्लेषण केल्यावर प्रशिक्षणात समाविष्ट करण्यासाठी अधिनियमातील विनिर्दिष्ट कलमे व अन्य तपशीलाला अंतिम स्वरूप देण्यात आले. त्यानुसार संबंधित घटकांशी संबंधित लघुचित्रपट / चित्रपटातील क्षणचित्रे निवडण्यात आली, अधिनियमातील तरतुदीत समाविष्ट असलेले वाचन साहित्य, सादरीकरणे, प्रश्नोत्तर स्वरुपात शंका समाधान व नेहमी विचारले जाणाऱ्या प्रश्नांची नमुना उत्तरे तयार करून घेण्यात आली. या सुरवातीच्या तयारी नंतर राज्य स्तरावरील प्रशिक्षकांची पहिली प्रशिक्षण कार्यशाळा दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी व नंतर दुसरी राज्यस्तरावरील प्रशिक्षकांची प्रशिक्षण

कार्यशाळा दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे यांच्यातर्फे संचालित करण्यात आली. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे १३० राज्य स्तरीय प्रशिक्षक तयार करण्यात आले व सदर प्रशिक्षकांनी सन २०१५ मध्ये जिल्हा स्तरावरील प्रशिक्षकांचे प्रशिक्षण ३६ जिल्ह्यांमध्ये संचालित करून २,८१५ जिल्हा सत्र प्रशिक्षक किंवा संसाधन व्यक्तींना पुढील स्तरावर प्रशिक्षण प्रदान करण्यासाठी तयार केले.

अधिनियम व त्यामधील तरतुदींच्या बाबत जागरुकता निर्माण करण्याच्या उद्दिष्टाने उपरोक्त प्रशिक्षकांनी शासकीय अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याच्या पहिल्या टप्प्यात २८,७३३ सहभागी अधिकारी/ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले. त्याचप्रमाणे दुसऱ्या टप्प्यात ५२,७७९ अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले.

यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे ह्याच्या सदर प्रयत्नांची भारत सरकारच्या कर्मचारी व प्रशिक्षण विभागाने दखल घेऊन सन २०१५-१६ साठीचा "प्रशिक्षणातील उत्कृष्टता" पुरस्कार बहाल करून यशदाला गौरविले आहे.

### ४.२.२ जागरुकता प्रशिक्षण टप्पा -२ (२०१६-१७)

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ मधील संबंधित तरतुदी बाबत शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यात आली. त्यानंतर विभागातील पदनिर्देशित अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. सन २०१६-१७ मध्ये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांनी सदर विषयात विभागवार प्रशिक्षक तयार केले. त्यासाठी महसूल विभाग, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, पशुसंवर्धन विभाग, मत्स्य व दुग्ध व्यवसाय विकास विभाग व महिला व बालकल्याण (**ICDS**) विभागाची निवड करण्यात आली.

**तक्ता ४.१ : यशदा, पुणे यांचे तर्फे प्रशिक्षण कार्यक्रम २०१६-१७**

| क्र | विभाग | प्रशिक्षक | प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|
| १ | महसूल | ८१ | ७,२९८ |
| २ | पशुंवर्धन, मत्स्य व दुग्ध व्यवसाय विकास विभाग | १३८ | ३,०७७ |
| ३ | ग्राम विकास व पंचायत राज | १२५ | १२,९४३ |
| ४ | महिला व बालकल्याण विभाग (ICDS) | १३१ | ९०,३०५ |
| ५ | कृषी , गृह ( पोलीस ) व अन्य | ० | ८,३१३ |
| | **एकूण** | **४७५** | **१,२१,९३६** |

### ४.२.३ मुलभूत प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दरम्यान प्रशिक्षण कार्यक्रम

सन २०१७-१८ दरम्यान यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे यांच्या माध्यमातून १६,९६२ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. मात्र सन २०१५ ते ३१ मार्च २०१९ ह्या कालावधीत यशदाने एकूण २,३१,२४५ अधिकाऱ्यांना प्रशिक्षित केले आहे.

**तक्ता ४.२ दरवर्षी प्रशिक्षित गट “अ” अधिकारी**

| क्र | वर्ष | गट अ मधील प्रशिक्षणार्थी अधिकारी |
|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ६५२ |
| २ | २०१६-१७ | ३५९ |
| ३ | २०१७-१८ | १,३६६ |
| ४ | २०१८-१९ | १,०५८ |
| | **एकूण** | ३,४३५ |

**तक्ता ४.३ दरवर्षी प्रशिक्षित गट “ब” व “क” अधिकारी**

| क्र | वर्ष | गट ब व क मधील प्रशिक्षणार्थी अधिकारी |
|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ८४,२७८ |
| २ | २०१६-१७ | १,२१,५९२ |
| ३ | २०१७-१८ | १३,८०४ |
| ४ | २०१८-१९ | ८,१३६ |
| | **एकूण** | **२,२७,८१०** |

## ४.३ महाऑनलाईन तर्फे तांत्रिक प्रशिक्षण

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची अंमलबजावणी करण्यासाठी ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जांवर प्रक्रिया करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल प्रणाली विकसित करून तिचे विभागाशी एकत्रीकरण करण्यासाठी राज्य शासन व टाटा सल्लागार सेवा यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या महाऑनलाईन लिमिटेड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

लोकसेवांची प्रक्रिया समजून घेण्यासाठी महाऑनलाईनने प्रत्येक विभागात विश्लेषक नियुक्त केला होता व त्यामुळे अर्जाच्या नमुन्यांचे प्रमाणीकरण, दर सुसंगतीकरण व प्रक्रिया प्रवाहाचे सुलभीकरण करण्यात मोठीच मदत झाली. आपले सरकार सेवा पोर्टल द्वारे नागरिकांना सुलभतेने अर्ज करता येण्यासाठी महाऑनलाईनने सदर उपक्रम पार पाडला. सर्व विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांसाठी अनुभवांवर आधारित प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

महाऑनलाईन यांनी क्षेत्रिय स्तरावरील विभागांच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर जिल्हा समन्वयक नेमला आहे. जिल्हा स्तरावरील जिल्हा समन्वयकांनी विभागांच्या जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांसाठी ५१० प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले होते.

- सदर प्रशिक्षण कार्यक्रमात प्राप्त अर्जांचा व त्यासोबत जोडावयाच्या दस्तऐवजांचा आढावा घेण्यात आला.
- मागोवा व त्रयस्थ पक्षाने पडताळणी करण्याच्या उपक्रमाचा उपयोग.
- विभाग स्तरावरील प्रकिया प्रवाहासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण.
- अपील स्तरावरील अपिलीय प्राधिकाऱ्यांना प्रशिक्षण.
- व्यवस्थापन माहिती प्रणालीसाठी डॅशबोर्ड प्रशिक्षण.

**प्रशिक्षणाची सांख्यिकी :** महाऑनलाईनने विविध विभागांना तांत्रिक प्रशिक्षण दिले आहे. महाऑनलाईनने ६१९ प्रशिक्षण कार्यक्रम संचालित केले असून ७,९०० अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले आहे.

सन २०१८-१९ मध्ये यशदा मार्फत ९,१९४ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले व महाऑनलाईनने ७,९०० अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले. अशा पद्धतीने सन २०१८-१९ या वर्षामध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणी अंतर्गत एकूण १७,०९४ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

# प्रकरण ५ : लोकसेवा हक्काचा नागरिकांकडून उपयोग

## ५.१ विभागवार अधिसूचित सेवा

लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत एकूण ३१ विभागांपैकी २६ विभागांनी ४८६ सेवा अधिसूचित केल्या आहेत. उद्योग, कामगार व उर्जा विभाग (७३) महसूल व वन विभाग (६३), नगर विकास विभाग (५७) व गृह व परिवहन विभाग (५२) ह्या चार विभागांनी जास्तीतजास्त सेवा अधिसूचित केल्या आहेत. सामान्य प्रशासन विभाग, नियोजन विभाग, संसदीय कार्य विभाग, मराठी भाषा विभाग, इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग – या पाच विभागांनी कोणत्याही सेवा अद्याप अधिसूचित केलेल्या नाहीत

### तक्ता ५.१ : दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी अधिसूचित सेवांची विभागवार यादी

| अ क्र . | विभागाचे नाव | उपविभागाचे नाव | एकूण अधिसूचित सेवा |
|---|---|---|---|
| १ | गृह व परिवहन विभाग | गृह विभाग | १७ |
| | | परिवहन विभाग | १४ |
| | | राज्य उत्पादन शुल्क | १४ |
| | | महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड | ०७ |
| २ | महसूल व वन विभाग | महसूल विभाग | २० |
| | | भूमी अभिलेख विभाग | १८ |
| | | वन विभाग | ११ |
| | | नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग | १४ |
| ३ | कृषी पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, व मत्स्य व्यवसाय विकास विभाग | कृषी विद्यापीठे | ०९ |
| | | कृषी विभाग | १५ |
| | | पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभाग | १६ |
| | | मत्स्य व्यवसाय विकास विभाग | |
| ४ | नगर विकास विभाग | नगर विकास विभाग | ५७ |
| ५ | विधी व न्याय विभाग | विधी व न्याय विभाग | ०४ |
| ६ | ग्रामविकास व पंचायतराज विभाग | ग्राम विकास व पंचायतराज विभाग | १३ |
| ७ | मृद व जलसंधारण विभाग | मृद व जलसंधारण विभाग | ०८ |
| ८ | अन्न , नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | १८ |
| ९ | गृहनिर्माण विभाग | महाराष्ट्र क्षेत्र व गृहनिर्माण विकास प्राधिकरण | १२ |
| | | मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळ | ०४ |
| | | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | ०४ |
| १० | महिला व बालविकास विभाग | महिला व बालविकास विभाग | १३ |
| ११ | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | ०२ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | अल्पसंख्यांक विकास विभाग | अल्पसंख्यांक विकास विभाग | ०१ |
| १३ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग | उद्योग विभाग | १० |
| | | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | ०७ |
| | | शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय | ०२ |
| | | कामगार विभाग | ४१ |
| | | उर्जा विभाग | १० |
| | | महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड | ०३ |
| १४ | वित्त विभाग | राज्य वस्तू व सेवा कर विभाग | ०४ |
| १५ | जलसंपदा विभाग | जलसंपदा विभाग | १० |
| १६ | सहकार , पणन, व वस्त्रोद्योग विभाग | सहकार , पणन, व वस्त्रोद्योग विभाग | ०५ |
| १७ | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | ०२ |
| | | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (GSDA) | ०२ |
| १८ | सार्वजनिक आरोग्य विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग | ०४ |
| १९ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | १२ |
| २० | आदिवासी विकास विभाग | आदिवासी विकास विभाग | ०२ |
| २१ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | १२ |
| २२ | वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग | वैद्यकीय शिक्षण विभाग (आयुष) | ०७ |
| | | वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय | ०८ |
| | | वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय (महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था) | ०६ |
| | | अन्न व औषध प्रशासन | ०४ |
| २३ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | २० |
| २४ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | महाराष्ट्र तांत्रिक शिक्षण मंडळ | ०४ |
| | | विद्यापीठे | ०६ |
| २५ | पर्यावरण विभाग | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | ०४ |
| २६ | सार्वजनिक बांधकाम विभाग | सार्वजनिक बांधकाम विभाग | १० |
| २७ | सामान्य प्रशासन विभाग | सामान्य प्रशासन विभाग | निरंक |
| २८ | नियोजन विभाग | नियोजन विभाग | निरंक |
| २९ | संसदीय कार्य विभाग | संसदीय कार्य विभाग | निरंक |
| ३० | मराठी भाषा विभाग | मराठी भाषा विभाग | निरंक |
| ३१ | इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग | इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग | निरंक |
| | **३१** | **५२** | **४८६** |

## ५.२ विभागवार प्राप्त व कार्यवाही केलेल्या अर्जांची स्थिती

ऑक्टोबर, २०१५ ते मार्च, २०१९ या कालावधीत सर्व ३१ विभागांना एकूण ६,४४,६५,६६८ अर्ज प्राप्त झाले.




टीप :- सन २०१८-१९ या कालावधीत अर्जांची संख्या कमी होण्याचे प्रमुख कारण महसूल विभागाच्या "महाभूलेख" या वेगळ्या पोर्टलच्या माध्यमातून ४.२० कोटी ७/१२ उतारे निर्गमित करण्यात आले. यापूर्वी सदर उतारे "आपले सरकार" पोर्टल वरून दिले जात होते.

### ५.२.१ कार्यवाही झालेले व प्रक्रियेत असलेले अर्ज




सन २०१५-१९ या कालावधीत एकूण ६,४४,६५,६६८ अर्ज प्राप्त झाले व ६,२६,०६,६४१ अर्जांवर कार्यवाही करण्यात आली. म्हणजेच दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी ९७.१२ % अर्जांवर कार्यवाही करण्यात आली व २.८८ % अर्जांवर कार्यवाही सुरु होती.




सन २०१८-१९ या कालावधीत प्राप्त एकूण १,८६,३८,६८१ प्राप्त अर्जांपैकी १,७६,२१,६९१ अर्जांवर कार्यवाही करण्यात आली. म्हणजेच दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी ९४.५४ % अर्जांवर कार्यवाही झाली होती व ५.४६ % अर्ज प्रक्रियेत होते.

प्रत्येक विभागाची कामगिरी दुसऱ्या विभागापेक्षा भिन्न आहे. एकूण ३१ विभागांपैकी काही विभाग हे अर्ज प्राप्त करण्याच्या व त्यांच्या कार्यवाही होण्याच्या संख्येत आघाडीवर आहेत. आलेख क्रमांक ५.३

नुसार महसूल विभागास सर्वात जास्त अर्ज प्राप्त झाल्याचे व त्यावर कार्यवाही केल्याचे दिसून येते. अन्य दोन म्हणजेच कामगार व गृह विभाग हे अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर असून त्यांची कामगिरी ही अनुक्रमे आलेख क्रमांक ५.४ व ५.५ मध्ये दर्शविली आहे.

**आलेख क्रमांक ५.३ : सन २०१८-१९ या वर्षामध्ये महसूल विभागाने प्राप्त केलेले व कार्यवाही केलेल्या एकूण अर्जांची संख्या**




**आलेख क्रमांक ५.४ : सन २०१८-१९ या वर्षामध्ये कामगार विभागाने प्राप्त केलेले व कार्यवाही केलेल्या एकूण अर्जांची संख्या**






### ५.२.२ मंजूर व नामंजूर अर्ज

सन २०१८-१९ वर्षांच्या कालावधीत एकूण १,७६,२१,६९१ अर्जांचा निपटारा करण्यात आला. त्यापैकी १,७५,०३,३४८ म्हणजे ९९.३३% अर्ज मंजूर करण्यात आले. त्यावरून असे दिसून येते की फक्त ०.६७% अर्ज नामंजूर करण्यात आले. अर्ज नामंजूर होण्याचे इतके कमी प्रमाण कौतुकास्पद आहे. सदर अर्जांचा तपशील आलेख क्रमांक ५.६ मध्ये दिला आहे.




मंजूर व नामंजूर अर्जांची वर्षवार संख्या आलेख क्रमांक ५.७ मध्ये दर्शविली आहे.




सदर आलेखावरून असे दिसून येते की सन २०१५-२०१९ या सर्व वर्षात अर्ज नामंजूर करण्याचे प्रमाण सातत्याने अत्यल्प आहे.

## तक्ता क्रमांक ५.२ : २०१८-२०१९ कालावधीत मंजूर व नामंजूर अर्जांची विभागवार यादी

| क्रमांक | विभाग | प्राप्त | कार्यवाही झाली | मंजूर | नामंजूर |
|---|---|---|---|---|---|
| १ | महसूल विभाग | १,५९,३०,२८३ | १,५५,२१,५५४ | १,५४,६९,५३१ | ५२,०२३ |
| २ | कामगार विभाग | ९,५७,५३५ | ९,५३,४१७ | ९,४०,९५७ | १२,४६० |
| ३ | गृह व परिवहन विभाग | ६,८३,७२३ | ५,५६,३६७ | ५,५६,३४५ | २२ |
| ४ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | ५,१६,५८५ | ८८,४०३ | ८३,७८५ | ४,६१८ |
| ५ | उद्योग विभाग | २,७८,१५५ | २,७८,००५ | २,४७,०५१ | ३०,९५४ |
| ६ | आदिवासी विकास विभाग | ६९,७२१ | ६६,७१५ | ६०,१६६ | ६,५४९ |
| ७ | उर्जा विभाग | ६९,४९९ | ६६,४७८ | ५९,४२९ | ७,०४९ |
| ८ | राज्य उत्पादन शुल्क विभाग | ३०,९९९ | २८,९४० | २८,६०० | ३४० |
| ९ | विधी व न्याय विभाग | २८,२४१ | १,९२२ | १,९०९ | १३ |
| १० | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | २०,३६५ | २०,३६४ | २०,३६४ | ० |
| ११ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १२,३७४ | ९,९९८ | ९,९२१ | ७७ |
| १२ | सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग | ११,६५९ | ५,९६६ | ५,४७४ | ४९२ |
| १३ | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | ८,५२९ | ७,८४५ | ६,५४७ | १,२९८ |
| १४ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ७,५२६ | ४,९०१ | ४,३३९ | ५६२ |
| १५ | वन विभाग | ५,४७२ | ५,४७२ | ५,४७२ | ० |
| १६ | महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड | ३,०८० | १,९९५ | १,९६९ | २६ |
| १७ | नोंदणी व मुद्रांक विभाग | १,३९६ | १,३९६ | ३२ | १,३६४ |
| १८ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | १,३६२ | १,३२५ | ९३५ | ३९० |
| १९ | महिला व बालविकास विभाग | ६८९ | ० | ० | ० |
| २० | कृषी विभाग | ३७८ | २२ | ० | २२ |
| २१ | वैध वजन माप विभाग | ३७२ | २५६ | २५६ | ० |
| २२ | अल्पसंख्यांक विकास विभाग | २६० | १८२ | १८१ | १ |
| २३ | ग्राम विकास व पंचायत राज विभाग | २२६ | ९९ | २१ | ७८ |
| २४ | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | १५७ | २६ | २६ | ० |
| २५ | परिवहन विभाग | ६४ | २५ | २५ | ० |
| | | | | | |
| २६ | जलसंपदा विभाग | ११ | ० | ० | ० |
| २७ | वित्त विभाग – वस्तू व सेवा कर विभाग | १० | १० | १० | ० |
| २८ | नगर विकास विभाग | ५ | ४ | ० | ४ |
| २९ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | ४ | ३ | ३ | ० |
| ३० | गृह निर्माण विभाग | १ | १ | ० | १ |
| ३१ | पशुसंवर्धन विभाग | ० | ० | ० | ० |
| ३२ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | ० | ० | ० | ० |
| | **एकूण संख्या** | **१,८६,३८,६८१** | **१,७६,२१,६९१** | **१,७५,०३,३४८** | **१,१८,३४३** |

स्त्रोत :- महाऑनलाईन

### ५.२.३ विहित कालावधीत कार्यवाही झालेल्या व कार्यवाही न झालेल्या अर्जांची संख्या




सन २०१८-१९ या कालावधीत सर्व विभागांनी १,७६,२१,६९१ अर्जांवर विहित कालावधीत कार्यवाही केली, म्हणजेच ४७ % अर्जांवर विहित कालावधीत कार्यवाही झाली, तर ५३ % अर्जांवर विलंबाने कार्यवाही झाली.



**आलेख क्रमांक ५.८ (क) महसूल विभागाच्या व्यतिरिक्त सर्व विभागांनी वेळेवर व विलंबाने कार्यवाही केलेल्या अर्जांची संख्या**




टीप: सन २०१८-१९ या कालावधीत वेळेवर सेवा देण्याचे प्रमाण ४७% व विलंबाने सेवा देण्याचे प्रमाण ५३% असल्याचे महत्वपूर्ण निरीक्षण आयोगाने नोंदविले आहे. महसूल विभागाकडून सेवा पुरवण्यात होत असलेल्या विलंबामुळे सदर प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. महसूल विभाग वगळता इतर सर्व विभागांनी ९१% अर्जांवर विहित कालावधीत कार्यवाही केली आहे. सदर बाबत महसूल विभागाकडे खुलासा मागविण्यात आला असता प्रामुख्याने निवडणूक, नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना साहाय्य देणे व प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या अंमलबजावणी यामुळे विलंब झाल्याचे महसूल विभागाने कळविले आहे. तसेच पुढील वर्षात सेवा देण्यातील विलंब टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन महसूल विभागाने दिले आहे.

## ५.३ विविध माध्यमाद्वारे प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या

आपले सरकार सेवा केंद्र – व्हीएलई, आपले सरकार सेवा केंद्र – सेतू, आपले सरकार पोर्टल व आपले सरकार सेवा केंद्र – ग्रामपंचायत या माध्यमातून लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत अर्ज प्राप्त झालेले आहेत.







## ५.४ महसूल विभागवार सेवांची स्थिती

सदर आलेखात राज्याच्या सहा महसुली विभागात लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत प्राप्त अर्ज दिसून येतात. एकूण प्राप्त अर्जांपैकी सदर सहा महसूली विभागांमध्ये पुणे महसूल विभागात सर्वात जास्त अर्ज प्राप्त होऊन त्यावर कार्यवाही झाल्याचे दिसून येते.

**आलेख क्रमांक ५.११ : सन २०१८-१९ या वर्षी मंजूर व कार्यवाही झालेले अर्ज**




## ५.५ अर्जांची जिल्हावार स्थिती

जिल्ह्यांमध्ये प्राप्त अर्जांचा आढावा घेता व त्याचे विश्लेषण करता, प्राप्त व कार्यवाही झालेल्या अर्जांच्या संख्येत पुणे जिल्ह्याचा पहिला क्रमांक दिसून येतो. सर्व जिल्ह्यांच्या कामगिरीवर खालील आलेखात दृष्टिक्षेप टाकला आहे.

**आलेख क्रमांक ५.१२ : सन २०१८-१९ या वर्षी जिल्हावार एकूण प्राप्त अर्ज**



**आलेख क्रमांक ५.१३ : सन २०१८-१९ या वर्षी कार्यवाही केलेले जिल्हावार एकूण अर्ज**



## आलेख क्रमांक ५.१४ : सन २०१८-१९ या वर्षी जिल्हावार एकूण मंजूर अर्ज



## ५.६ लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत अपिलांची स्थिती

लोकसेवा हक्क अधिनियमानुसार अर्जदारांना विहित कालावधीत सेवा न पुरविल्यास किंवा न्यायोचित कारणाशिवाय अर्ज नामंजूर केल्यास, विभागाने विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील करण्याचा हक्क अर्जदाराला आहे. प्रथम अपिलावर विहित कालावधीत कार्यवाही न झाल्यास विभागाने विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडे दुसरे अपील करण्याचा हक्क अर्जदाराला आहे. अर्जदार महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाकडे तिसरे अपील दाखल करू शकतात.






आलेख क्रमांक ५.१७ सन २०१८-१९ या वर्षी तृतीय अपिलाची स्थिती




## ५.७ अधिसूचित सेवांना प्राप्त प्रतिसादाच्या आधारावर विभागांचे वर्गीकरण

अधिनियमाच्या अंतर्गत अधिसूचित लोकसेवांची संख्या विभागवार वेगवेगळी आहे. त्याचप्रमाणे प्राप्त होणाऱ्या व प्रतिसाद दिल्या जाणाऱ्या अर्जांची संख्या सुद्धा वेगवेगळी आहे. आपले सरकार पोर्टलचा उपयोग करून अधिसूचित सेवांच्या व त्या अनुषंगाने प्राप्त अर्जांवर त्यांनी केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भाने विभागांचे वर्गीकरण केले आहे. वर्गीकरण हे वेगवेगळ्या रंगाने चिन्हांकित केले असून त्याचे निकष खालील प्रमाणे विशद केले आहे.

| क्रमांक | हिरव्या श्रेणीसाठीचे निकष |
|---|---|
| १ | अर्ज स्वीकारण्याची व निपटाऱ्याची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने पूर्ण करून "आपले सरकार" पोर्टल द्वारे सेवा देण्यात येते. |
| २ | बहुतांशी सेवांना उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. |
| ३ | उत्तम प्रतिसाद - प्रत्येक सेवेसाठी १००० पेक्षा जास्त संख्येने अर्ज प्राप्त होतात. |
| ४ | मध्यम प्रतिसाद - प्रत्येक सेवेसाठी १००० पेक्षा कमी संख्येने अर्ज प्राप्त होतात. |
| ५ | शून्य प्रतिसाद - सेवेसाठी अर्ज प्राप्त झाला नाही. |

| क्रमांक | अंबर श्रेणीसाठीचे निकष |
|---|---|
| १ | काही सेवांसाठीच ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यात येतात . विभागाचा कार्यप्रवाह डिजिटल आहे व नागरिकांना सेवांचे वितरण "आपले सरकार" पोर्टल द्वारे करण्यात येते. |
| २ | उत्तम प्रतिसाद - प्रत्येक सेवेसाठी १००० पेक्षा जास्त संख्येने अर्ज प्राप्त होतात. |
| ३ | मध्यम प्रतिसाद - प्रत्येक सेवेसाठी १००० पेक्षा कमी संख्येने अर्ज प्राप्त होतात. |
| ४ | शून्य प्रतिसाद - सेवेसाठी अर्ज प्राप्त झाला नाही. |

| क्रमांक | लाल श्रेणीसाठीचे निकष |
|---|---|
| १ | नागरिकांना सेवा देण्यासाठी आपले सरकार पोर्टलचा उपयोग नागरिकांनी करावा म्हणून विभागाकडून प्रयत्न नाहीत. |
| २ | “आपले सरकार” पोर्टलशी एकत्रीकरण पूर्ण झाले आहे, परंतु सेवा व रक्कम प्रदान करण्यासाठी एकच व्यासपीठ (single platform) या धोरणाचे पालन केले जात नाही. |
| ३ | ऑनलाईन प्रणालीचा वापर न केल्यामुळे प्राप्त अर्ज व त्या अर्जांवर केलेल्या कार्यवाही व सद्य स्थितीची पडताळणी करणे शक्य नाही. |

**अधिसूचित सेवांना ऑनलाईन प्रणालीचा वापर करून मिळालेल्या प्रतिसादानुसार विभागांची खालील प्रमाणे वर्गवारी केली आहे :**

## तक्ता ५.४ हिरव्या श्रेणीत वर्गीकृत केलेले विभाग

| क्रमांक | विभाग | सेवा | उत्तम प्रतिसाद | मध्यम प्रतिसाद | शून्य प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|
| १ | महसूल व भूमी अभिलेख | ३८ | १९ | १३ | ६ |
| २ | कामगार | ४१ | १२ | २६ | ३ |
| ३ | उर्जा | ६ | ५ | १ | ० |
| ४ | मुद्रण व लेखनसामग्री महासंचालनालय (उद्योग) | २ | २ | ० | ० |
| | **एकूण** | **८७** | **३८** | **४०** | **९** |

स्त्रोत : महाऑनलाईन (३१ मार्च, २०१९ रोजी )

## तक्ता क्रमांक ५.५ अंबर श्रेणीत वर्गीकृत केलेले विभाग

| क्रमांक | विभाग | सेवा | उत्तम प्रतिसाद | मध्यम प्रतिसाद | शून्य प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|
| १ | गृह | १५ | ३ | ५ | ७ |
| २ | पर्यावरण (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ) | ४ | २ | ० | २ |
| ३ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १० | ३ | ६ | १ |
| ४ | ग्रामविकास व पंचायतराज विभाग | १३ | ४ | ७ | २ |
| ५ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | १० | ३ | २ | ५ |
| ६ | सार्वजनिक आरोग्य | १ | १ | ० | ० |
| ७ | उद्योग | १० | ३ | २ | ५ |
| ८ | परिवहन ( मेरीटाईम बोर्ड ) | ७ | १ | ६ | ० |
| ९ | राज्य उत्पादन शुल्क | १४ | ३ | १० | १ |
| १० | जल संपदा विभाग | १० | ० | ९ | १ |
| ११ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी | ३ | ३ | ० | ० |
| १२ | विधी व न्याय विभाग | ३ | १ | १ | १ |

| क्रमांक | विभाग | सेवा | उत्तम प्रतिसाद | मध्यम प्रतिसाद | शून्य प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|
| १३ | महिला व बालकल्याण विभाग | १२ | ० | ११ | १ |
| १४ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | ७ | १ | १ | ५ |
| १५ | आदिवासी विकास विभाग | १ | १ | ० | ० |
| १६ | नोंदणी व मुद्रांक विभाग | १४ | २ | ८ | ४ |
| १७ | गृहनिर्माण विभाग – म्हाडा | १२ | ० | ९ | ३ |
| १८ | गृहनिर्माण विभाग – इमारत दुरुस्ती मंडळ | ४ | ० | ० | ४ |
| १९ | सहकार , विपणन व वस्त्रोद्योग विभाग | ५ | ३ | २ | ० |
| २० | नगर विकास विभाग | २४ | ० | २४ | ० |
| २१ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | १० | १ | ५ | ४ |
| | **एकूण** | **१८९** | **३५** | **१०८** | **४६** |

स्त्रोत : महाऑनलाईन (३१ मार्च, २०१९ रोजी)

## तक्ता क्रमांक ५.६ लाल श्रेणीत वर्गीकृत केलेले विभाग

| क्रमांक | विभाग | सेवा | उत्तम प्रतिसाद | मध्यम प्रतिसाद | शून्य प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|
| १ | कृषी विभाग | २४ | ० | ३ | २१ |
| २ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | १२ | २ | ६ | ४ |
| ३ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | २० | ० | ० | २० |
| ४ | परिवहन विभाग | १४ | १ | १३ | ० |
| ५ | वित्त विभाग | १ | ० | ० | १ |
| ६ | गृहनिर्माण विभाग – झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | ४ | ० | ४ | ० |
| ७ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | २१ | ० | ० | २१ |
| ८ | वन विभाग | १० | ० | ० | १० |
| ९ | पशुसंवर्धन विभाग | १० | ० | ९ | १ |
| १० | मत्स्य व्यवसाय विभाग | ६ | ० | ३ | ३ |
| ११ | पाणी पुरवठा – भूजल सर्वेक्षण व विकास विभाग | २ | ० | ० | २ |
| १२ | कौशल्य विकास | २ | ० | ० | २ |
| १३ | अल्पसंख्यांक विभाग | १ | ० | १ | ० |
| | **एकूण** | **१२७** | **३** | **३९** | **८५** |

**स्त्रोत: महाऑनलाईन (३१ मार्च, २०१९ रोजी)**

**टीप :**

१. लाल श्रेणीत समाविष्ट असणारे विभाग व सेवांमध्ये घट झाल्याचे दिसून येत आहे. सन २०१७-१८ च्या वार्षिक अहवलानुसार २३ विभाग लाल श्रेणीत होते तर सन २०१८-१९ साठीच्या वार्षिक अहवालात लाल श्रेणीत समाविष्ट विभागांची संख्या १३ पर्यंत कमी झाली.

२. उपरोक्त विश्लेषण व वर्गीकरण हे ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येवर आधारित आहे. अंबर / लाल श्रेणीत वर्गीकृत झालेल्या विभागांकडे अनेक ऑफ लाईन अर्ज प्राप्त झालेले असण्याची शक्यता आहे. मात्र "अ", "ब" व "क" नमुने जारी करून व वारंवार ते सादर करण्यासाठी सूचना देउन सुद्धा ऑफलाईन प्राप्त, व निर्णय झालेल्या अर्जांची माहिती आयोगाला प्राप्त झालेली नाही.

३. त्याचप्रमाणे काही विभागांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सुविधा तर दिली आहे, पण त्याचे "आपले सरकार पोर्टल"शी एकत्रीकरण झालेले नाही. त्यामुळे "आपले सरकार पोर्टल"शी एकत्रीकरण न झालेल्या प्रणालीमधील प्राप्त व कार्यवाही झालेल्या अर्जांची माहिती नसल्यामुळे वरील विश्लेषनात त्याचा समावेश करण्यात आलेला नाही.

# प्रकरण ६ – सूचना, शिफारशी व पुढील वाटचाल आणि नाविन्यपूर्ण उपक्रम

अधिनियमातील कलम १६(१) नुसार आयोगाने अधिनियमाची योग्य अंमलबजावणी होण्याची खबरदारी घेणे व लोकसेवांचे अधिकाधिक उत्तम वितरण होण्यासाठी शासनाला सूचना करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. आयोगाने शासनाला खालील सूचना व शिफारशी केल्या आहेत.

## ६.१ सर्व विभागांना लागू सूचना व शिफारशी यांची सद्यस्थिती (२०१७-१८)

| क्रमांक | शिफारस | सद्यस्थिती |
|---|---|---|
| १ | सर्व विभागांनी उपलब्ध करण्यात आलेल्या सेवांची एक मास्टर लिस्ट तयार करून ती सार्वजनिक करावी. लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत सर्व सेवा अधिसूचित करण्यासाठी विभागांनी एक वेळापत्रक तयार करावे . | १. महसूल विभाग<br>२. कृषी विभाग<br>३. कामगार विभाग<br>४. नगर विकास विभाग-१<br>५. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग<br>६. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग<br>या सहा विभागांच्या मास्टर लिस्ट आयोगास प्राप्त झालेल्या आहेत. उर्वरित विभागांच्या मास्टर लिस्ट अद्याप अप्राप्त आहेत. |
| २ | सर्व शासकीय विभागांकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सेवांची एक केंद्रीकृत एकत्रित यादी सामान्य प्रशासन विभागाने (रचना व कार्यपध्दती) तयार करुन सार्वजनिक करावी . | प्रलंबित |
| ३ | लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणी साठी शासनाने प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून पदनिर्देशित करावे. | पूर्तता करण्यात आली आहे. |
| ४ | शासनाच्या धोरणाप्रमाणे सर्व विभागांनी लोकसेवांचे वितरण आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण करून घेणे आवश्यक आहे. | ८० अधिसूचित सेवांचे एकत्रिकरण करण्यात आलेले नाही. |
| ५ | सर्व विभागांनी ऑनलाईन व ऑफलाईन अर्जांची तपशीलवार माहिती विहित "अ", "ब" व "क" नमुन्यामध्ये आयोगाला कळविणे आवश्यक आहे. | प्रलंबित |
| ६ | नागरीकांना सर्व अधिसूचित सेवांचा लाभ घेण्याची सुविधा सर्व आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आली पाहिजे. | नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग व महसूल विभागाने त्यानुसार शासन आदेश निर्गमित केले आहेत. |
| ७ | नियम ३ नुसार अधिसूचित सेवांची यादी, विहित कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे तपशील प्रत्येक कार्यालयात दर्शनीय ठिकाणी दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करण्याची खबरदारी सर्व विभागांनी घेणे आवश्यक आहे. | अंशत: अनुपालन झाले आहे. |
| ८ | लोकसेवा हक्क अधिनियमाच्या कलम १३ नुसार शासनाने सहा महसुली विभागांमध्ये सहा लोकसेवा | प्रलंबित |

| | | |
|---|---|---|
| | आयुक्त नेमणे आवश्यक आहेत. सदर बाबीची त्वरित पूर्तता व्हावी. | |
| ९ | लाल श्रेणीत वर्गीकृत केलेल्या विभागांच्या सचिवांनी अत्यल्प किंवा शून्य प्रतिसाद प्राप्त झालेल्या सेवांचा आढावा घ्यावा व ही स्थिती सुधारण्यासाठी एक महिन्याच्या आत पावले उचलावीत . | अंशतः अनुपालन करण्यात आले आहे. लाल श्रेणीतील विभागांची संख्या २३ वरून १३ एवढी कमी झाली आहे. |
| १० | सर्व विभागांनी लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत उपलब्ध करण्यात आलेल्या सेवांचा नियमित आढावा घेऊन वस्तू आणि सेवा करामुळे कालबाह्य झालेल्या विक्रीकर व करमणूक करासारख्या सेवा वगळून नवीन सेवा अधिसूचित कराव्यात. | पूर्तता करण्यात आली आहे. |
| ११ | कोकण विभागातील जिल्हाधिकाऱ्यांनी अधिसूचित केलेल्या सेवांमध्ये एकवाक्यता नाही. सदर त्रुटी दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. | पूर्तता करण्यात आली आहे |
| १२ | आपले सरकार पोर्टलचा उपयोग करून स्थानिक स्वराज्य संस्थांनी उपलब्ध केलेल्या सेवांच्या मार्फत प्राप्त होणारा महसूल त्यांना त्वरित उपलब्ध होईल याची खबरदारी माहिती तंत्रज्ञान विभाग व महाऑनलाईन यांनी घेतली पाहिजे. | पूर्तता करण्यात आली आहे. |
| १३ | ऑनलाईन प्रणाली व तिच्या उपयोगाबाबत त्रयस्थ लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. | प्रलंबित |
| १४ | सर्व विभागांनी सर्व पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकाऱ्यांचे पत्ते, ई-मेल, व दूरध्वनी क्रमांक दर्शनीय भागात प्रदर्शित करून ते वेळोवेळी अद्ययावत करावे. | ही माहिती सतत अद्ययावत करण्याची आवश्यकता आहे. |
| १५ | माहिती तंत्रज्ञान विभागाने डॅशबोर्ड प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. | पूर्तता करण्यात आली आहे |
| १६ | महाऑनलाईनने संबंधित पदनिर्देशित अधिकारी व अपिलीय अधिकाऱ्यांना सतर्क करणारी लघुसंदेश (SMS) सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. | अंशतः अनुपालन झाले आहे |
| १७ | अधिनियमातील तरतुदीनुसार नागरिकांना कालबद्ध व कार्यक्षम सेवा उपलब्ध करून देणाऱ्या व सर्वोत्तम कामगिरी बजावणाऱ्या कर्मचारी / अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्याची योजना सर्व विभागांनी तयार करणे आवश्यक आहे. | प्रलंबित |
| १८ | लोकसेवा हक्क अधिनियमाच्या जिल्ह्यातील अंमलबजावणीचा जिल्हाधिकाऱ्यांनी मासिक आढावा घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे | सूचना देण्यात आलेल्या आहेत |

| | | |
|---|---|---|
| | विभागीय आयुक्तांनी सुद्धा अशी नियमित आढावा बैठक घेणे आवश्यक आहे. | |
| १९ | आपले सरकार पोर्टल द्वारे ऑनलाईन अपील सादर करण्याची सुविधा महाऑनलाईन व माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी नागरिकांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. | कार्यवाही पूर्ण |
| २० | सर्व विभागांनी प्रक्रिया सोपी करण्यासाठी त्याचा सतत आढावा घेतला पाहिजे व त्यासाठी सतत प्रयत्न करावेत. | सातत्यपूर्ण कार्यवाही आवश्यक आहे |
| २१ | दिनांक १५ ऑगस्ट, २०१७ रोजी भरलेल्या ग्रामसभेत नागरिकांना लोकसेवा हक्क अधिनियम व अधिसूचित सेवांची तपशीलवार माहिती देण्यात यावी. | कार्यवाही पूर्ण |
| २२ | सर्व पदनिर्देशित अधिकारी व अपिलीय अधिकाऱ्यांना डॅश बोर्ड उपलब्ध करून दिला पाहिजे. | अंशत: अनुपालन झाले आहे |
| २३ | प्रथम अपिलीय प्राधिकारी व द्वितीय अपिलीय प्राधिकारी यांनी दोन्ही पक्षकारांना सुनावणीची संधी देऊन आपल्या निर्णयाची कारणे नोंदविणे आवश्यक आहे . | सूचना देण्यात आल्या आहेत. |
| २४ | सर्व विभागांनी त्यांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अधिनियम व उपलब्ध करून देण्यात आलेल्या लोकसेवांच्या बाबत जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्याच्या सूचना द्याव्यात. माध्यमे, भित्तीचित्रे, लोकप्रिय कलाकार, लोककलाकार, आठवडी बाजार, आणि अन्य साधनांचा वापर करून सदर कार्यवाही करावी. | याबाबत जिल्हाधिकारी, पुणे, नागपूर, बुलढाणा, गोंदिया, नंदूरबार, भंडारा, विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडून केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास प्राप्त झालेला आहे. |

## ६.२ विभागनिहाय सूचना व शिफारशी यांची सद्यस्थिती ( सन २०१७-१८)

| क्रमांक | शिफारस | सद्य:स्थिती |
|---|---|---|
| **१** | **महसूल विभाग** | |
| | १. महसूल विभागाने अधिसूचित केलेल्या सेवा सर्व जिल्ह्यांना लागू होणे आवश्यक आहे. काही जिल्ह्यांमध्ये अधिसूचित सेवांच्या यादीत फरक आहे. सदर त्रुटी दुरुस्त करणे आवश्यक आहे.<br>२. वस्तू व सेवा करांमुळे करमणूक कर, सेवा कर इत्यादी सेवा निरस्त करणे आवश्यक आहे. | पूर्तता करण्यात आली आहे. |
| **२** | **गृह विभाग** | |
| | चारित्र्य प्रमाणपत्र वगळता गृह विभागाच्या बहुतांशी ऑनलाईन सेवांना फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे विभागाने विशेष मोहीम आखून विभागातील सेवा ऑनलाईन उपलब्ध असल्याबाबत जनतेमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. | प्रलंबित |
| **३** | **नगर विकास विभाग** | |
| | नगरपालिका व महानगरपालिकांकडून उपलब्ध होणाऱ्या सेवा आपले सरकार पोर्टलशी एकत्रित करून घेणे हे महत्वाचे आव्हान आहे. सदर एकत्रीकरण करण्याची खबरदारी नगरविकास विभागाने घेणे आवश्यक आहे. | अंशत: कार्यवाही पूर्ण |
| **४** | **परिवहन विभाग** | |
| | १. महाऑनलाईनने परिवहन विभागाच्या सेवांचे आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण केले पाहिजे.<br>२. विभागाने ऑनलाईन अर्जांचा आढावा घेऊन अर्जांचे सुधारित नमुने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.<br>३. प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकाऱ्यांच्या साठी सतर्क करणारी लघुसंदेश (SMS) प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. | प्रलंबित |
| **५** | **वन विभाग** | |
| | १. विभागाने ऑनलाईन सेवा पोर्टल हे आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण करून घेणे आवश्यक आहे. | अनुपालन झाले आहे |
| | २. ऑनलाईन व ऑफलाईन प्राप्त झालेल्या अर्जांची माहिती विभागाने उपलब्ध करून दिली पाहिजे व पूर्तता अहवाल आयोगाला सादर करणे आवश्यक आहे. | प्रलंबित |
| | ३. ग्रामसभेत माहिती देऊन तसेच भित्तीपत्रके, कार्यशाळा आयोजित करून विभागाने अधिनियमाच्या अंतर्गत उपलब्ध सेवांच्या बाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. | प्रलंबित |
| **६** | **उद्योग विभाग** | |
| | १. उद्योग सचिव यांनी विभागातर्फे अधिसूचित सेवांचा आढावा घेऊन त्यांची अद्ययावत यादी तयार करणे आवश्यक आहे. | प्रलंबित |

| | | |
|---|---|---|
| | २. महाऑनलाईनने कामगार विभागाच्या पोर्टलचे आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण करणे आवश्यक आहे. | कार्यवाही पूर्ण |
| | ३. अर्जांचा निपटारा होण्यासाठी विभागाने प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित केले पाहिजे. | पूर्तता झाली आहे |
| **७** | **महाराष्ट्र क्षेत्र व गृहनिर्माण विकास प्राधिकरण** | |
| | महाराष्ट्र क्षेत्र व गृहनिर्माण विकास प्राधिकरण यांनी वेगळे पोर्टल विकसित केले असून त्याचे आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण आवश्यक आहे . | पूर्तता झाली आहे |
| **८** | **शालेय शिक्षण व क्रीडा** | |
| | लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत विभागाने १८ सेवा अधिसूचित केल्या आहेत. परंतु ऑनलाईन प्रणालीचा वापर अत्यल्प आहे. विभागाने "अ", "ब" व "क" नमुन्यात दरमहा माहिती सादर करणे आवश्यक आहे. | प्रलंबित |
| **९** | **महिला व बालकल्याण विभाग** | |
| | १. विभागाने आढावा घेऊन अधिनियमाच्या अंतर्गत अधिसूचित सेवा समाविष्ट व निरस्त करण्याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.<br>२. विभागाने विविध योजनांच्या अंतर्गत लाभार्थ्यांची संख्या महाऑनलाईनला कळविणे आवश्यक आहे. | प्रलंबित |
| **१०** | **पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग** | |
| | १. दोन्ही विभागांनी समन्वय साधून अधिनियमाच्या अंतर्गत अधिसूचित सेवांची पुनरुक्ती टाळली पाहिजे.<br>२. अर्जाचे नमुने सोपे करणे आवश्यक आहे<br>३. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांची माहिती (नाव व मोबाईल क्रमांक) अद्ययावत करणे आवश्यक आहे.<br>४. विविध योजनांची माहिती प्रदर्शित करावी.<br>५. जाहिरातीद्वारे जनतेमध्ये जागरूकता निर्माण करावी<br>६. विभागातर्फे उपलब्ध करून देण्यात आलेल्या सर्व सेवांची माहिती प्रसिद्ध करण्यात यावी. | प्रलंबित |
| **११** | **सार्वजनिक आरोग्य विभाग** | |
| | १. विभागाने आढावा घेऊन अधिनियमाच्या अंतर्गत अधिसूचित सेवा समाविष्ट व निरस्त करण्याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.<br>२. प्रादेशिक कार्यालयांमध्ये प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकाऱ्यांची माहिती प्रदर्शित करण्यात यावी. | प्रलंबित |
| **१२** | **पर्यावरण विभाग** | |
| | पर्यावरण विभागाने अधिसूचित केलेल्या चारही सेवा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देत असल्याबाबत आयोगाने प्रशंसा केली आहे. | अनुपालन झाले आहे |

| | | |
|---|---|---|
| **१३** | **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग** | |
| | १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे अधिसूचित दहा सेवांपैकी फक्त पाच सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विभागाने उर्वरित पाच सेवा सुद्धा ऑनलाईन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.<br>२. ज्येष्ठ नागरिक ओळखपत्रासाठी प्राप्त ७१,९३८ अर्जांपैकी ६८,१६१ अर्जांवर सेवा विहित कालमर्यादेत उपलब्ध करून देण्यात आली. मात्र दिव्यांग व्यक्तींकडून प्राप्त १४,१३९ अर्ज अद्याप प्रलंबित असून त्यावरील निर्णय त्वरित घेणे आवश्यक आहे.<br>३. यापैकी काही सेवा केंद्र सरकारतर्फे ऑनलाईन उपलब्ध करण्यात आल्या आहेत. थेट लाभ अंतरण पोर्टल (DBT) वर उपलब्ध योजना आपले सरकार पोर्टल वर असावी की नसावी याबाबत राज्य शासनाने त्वरित निर्णय घेणे आवश्यक आहे. | प्रलंबित |
| **१४** | **कृषी विभाग** | |
| | १. मृद व पाणी चाचणी ही अधिसूचित सेवा आहे. मात्र महाऑनलाईन द्वारे त्याची आज्ञावली विकसित करण्यात आलेली नाही. सदर काम त्वरित होणे आवश्यक आहे. | पूर्तता करण्यात आली आहे. |
| | २. कृषी विभागातर्फे वापरल्या जाणाऱ्या "अपेडा"प्रणालीचे महाऑनलाईनने आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण करणे आवश्यक आहे. | अपेडा प्रणालीव्दारे देण्यात येणाऱ्या सेवांचे आपले सरकार पोर्टलशी इंटिग्रेशन तांत्रिक कारणास्तव करणे शक्य होणार नाही असे महाऑनलाईन कं.ने विभागास कळविले आहे. |
| | ३. अधिनियमाच्या अंतर्गत नवीन सेवा अधिसूचित करण्यासाठी विभागाने सचिव व आयुक्त स्तरावरील बैठकीचे आयोजन करणे आवश्यक आहे. | प्रलंबित |

## ६.३ सर्व विभागांना लागू होणाऱ्या सूचना व शिफारशी (२०१८-१९)

| अ.क्र. | शिफारस | सद्यस्थिती |
|---|---|---|
| १ | संबंधित विभागप्रमुखांनी विलंबाने कार्यवाही झालेल्या प्रकरणांचा आढावा घ्यावा. महाऑनलाईन यांनी सादर केलेल्या अहवालानुसार प्राप्त अर्ज, निकाली काढलेले अर्ज, प्रलंबित अर्ज व विहीत कालावधीनंतर विलंबाने कार्यवाही केलेल अर्ज यांचे विश्लेषण करावे. या संदर्भात क्षेत्रीय कार्यालयांना येणाऱ्या अडचणी जाणून त्यावर उपाययोजना कराव्यात. | महसूल विभागाने आढावा घेतला असून निवडणुका, नैसर्गिक आपत्ती, व प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेची अंमलबजावणी अशा प्रमुख कारणांमुळे विलंब झाला आहे असे कळविले आहे. पुढील वर्षात विहित कालमर्यादेतच अधिसूचित सेवा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना केली जाईल असे आश्वासन महसूल विभागाने दिले आहे. |
| २ | आपले सरकार पोर्टल व्यतिरीक्त, आपल्या विभागातील सेवांबाबत अन्य पोर्टल केलेले असल्यास त्या पोर्टलचे आपले सरकार पोर्टलशी इंटिग्रेशन करावे. | अंशत: अनुपालन करण्यात आले आहे. |
| ३ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीकरीता माहिती व जनसंपर्क विभागाच्या मदतीने प्रचार/ प्रसार मोहिम, जाहिरात इ. माध्यमांतून व्यापक प्रमाणात प्रसिदधी देण्याबाबत कार्यवाही करावी. राज्य लोकसेवा हक्क कायद्या संदर्भात जनजागृती करावी. | जनजागृती मोहीम सतत करण्याची गरज आहे. |
| ४ | सामान्य प्रशासन विभागाने सद्यस्थितीत विविध विभागांकडून अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची यादी अद्ययावत करावी. | कार्यवाही पूर्ण |
| ५ | सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यरत असणाऱ्या आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या, कामकाज इ. बाबत आढावा घ्यावा. सदरहू केंद्रांमार्फत अर्ज सादर करण्याकरीता नागरीकांपर्यंत माहिती पोहचविण्यासाठी उपाययोजना कराव्यात. | अंशत: कार्यवाही पूर्ण |
| ६ | महाऑनलाईने विभागनिहाय व जिल्हानिहाय प्रलंबित अर्जांची संख्या उपलब्ध होण्याकरीता डॅशबोर्डवर ड्रॉपडाउन सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. | पुर्तता करण्यात आलेली आहे. |
| ७ | आयोगास माहिती देण्यात आली आहे की, डिजीटल स्वाक्षरी केलेले ऐपतीचे दाखले व जातीचे प्रमाणपत्र अनेक ठिकाणी स्विकारले जात नाहीत. याबाबत माहिती व तंत्राज्ञान विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी. | प्रलंबित |
| ८ | ऑफलाईन पध्दतीने देण्यात येणाऱ्या अधिसूचित सेवा ऑनलाईन करण्याबाबत वेळापत्रक तयार करून ऑफलाईन सेवा बंद करण्याबाबत (Sunset Clause) चे धोरण तयार करण्यात यावे व ऑफलाईन पध्दतीने दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा ऑनलाईन पध्दतीने देण्याबाबत कार्यवाही करावी. | प्रलंबित |

| | | |
|---|---|---|
| ९ | ज्या विभागांच्या सेवांना अल्प प्रतिसाद आहे त्या सेवांचा आढावा घेण्यात यावा. लोकांपर्यंत सेवेची माहिती पोहोचत नसल्यास मोठया प्रमाणात प्रचार व प्रसार, मोहिम राबविणे आवश्यक आहे. सर्व कार्यक्रमांच्या माध्यमातून ही बाब लोकांपर्यंत पोहचवावी. | प्रलंबित |
| १० | आपले सरकार पोर्टल व काही सेवा विभागांच्या स्वतंत्र पोर्टलचे समन्वय साधावा. नागरिकांना एका सेवेसाठी दोन वेगवेगळया पोर्टलवर अर्ज करावा लागणार नाही याची दक्षता घ्यावी. | प्रलंबित |
| ११ | १. सर्व विभागांनी तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालयांनी त्यांना या कायदयान्वये प्राप्त झालेल्या ऑफलाईन अर्जाची माहिती त्यांच्या निपटाऱ्यासह विहीत नमुना प्रपत्र “अ”,“ब” व “क” मध्ये भरून सामान्य प्रशासन विभागामार्फत आयोगास सादर करावी.<br>२. महाऑनलाईनने या बाबत संगणक प्रणाली तयार केली आहे. यावर सामान्य प्रशासन विभागाने त्वरित निर्णय घेवून ही प्रणाली डॅशबोर्डसह आयोगास अंतिम करून देण्यात यावी. | प्रलंबित |
| १२ | विविध विभागांमार्फत देण्यात येणारे काही दाखले, इंग्रजी भाषेत देण्यात येतात, त्यामुळे सर्व सामान्य नागरीकांना याचा बोध होत नाही, याकरीता प्रत्येक विभागामार्फत देण्यात येणारे दाखले इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेत देण्यात यावेत. | प्रलंबित |
| १३ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदयाकरीता घोषवाक्य व बोधचिन्ह निश्चित करण्यात आले आहे. सर्व विभागांनी त्यांच्या लेखनसामग्रीवर तसेच सर्व कार्यक्रमांत याचा प्रचार/प्रसार करण्याबाबत विचार करावा. | प्रलंबित |
| १४ | सर्व विभागांनी नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांसाठी तयार करण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यांचे सुलभीकरण करावे. | सर्व विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. |
| १५ | संबंधित प्रशासकीय विभागांनी सर्व सेवा आपले सरकार पोर्टलवरुन ऑनलाईन स्वरुपात देण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी व विभागांच्या सर्व अधिसूचित सेवा ऑनलाईन कराव्यात. | अंशत: कार्यवाही पूर्ण |
| १६ | सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारीतील आपले सरकार सेवा केंद्रांची यादी जिल्हयाच्या संकेतस्थळावर तात्काळ उपलब्ध करण्यात यावी. | प्रलंबित |
| १७ | सामान्य प्रशासन विभागाने परीपत्रक दि २८.०९.२०१५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत नागरिकांना अधिसुचित सेवा ऑनलाईन पुरविण्याची कार्यपद्धती विशद करण्यात आलेली आहे. त्यानुसार नागरिकांना सर्व अधिसूचित सेवा एकाच ठिकाणी एकाच संकेत स्थळावर मिळाव्यात या हेतूने आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तथापि, काही शासकीय प्राधिकरणे | प्रलंबित |

| | | |
|---|---|---|
| | त्यांच्या स्वतंत्र संकेतस्थाळावर अर्ज सादर केल्यासच अपेक्षित सेवा मिळू शकेल अशी भुमिका घेत असल्याचे आयोगाच्या निर्देशनास आले आहे. ही बाब शासनाच्या धोरणाशी विसंगत आहे. याकरीता माहिती तंत्रज्ञान विभागाने शासन धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता आदेश निर्गमित करावा. | |
| १८ | लोकसेवा हक्क कायद्यासंदर्भात विविध विभागाकडून निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रके आयोगास चिन्हांकित कराव्यात . | कार्यवाही पूर्ण |

## ६.४ विभागनिहाय सूचना व शिफारशी (२०१८-१९)

| | | |
|---|---|---|
| | **कामगार विभाग** | |
| १ | कामगार विभागाच्या काही सेवांना अल्प प्रतिसाद आहे. विभागाने सदरील सेवांचा अल्प प्रतिसाद याचा आढावा घ्यावा व विश्लेषण करावे | प्रलंबित |
| | कामगार विभागाच्या एकूण ४१ सेवांची मास्टरलिस्ट तयार करण्यात आली असून यापैकी १० सेवा अद्यापपर्यंत अधिसूचित करण्यात आलेल्या नाहीत. सदरहू सेवा अधिसूचित कराव्या किंवा कसे याबाबत विभागाच्या स्तरावर निर्णय घ्यावा. | मास्टर लिस्ट तयार करण्याची कार्यवाही पूर्ण |
| | **गृह विभाग** | |
| २ | गृह विभागाने १७ सेवा अधिसूचित केल्या आहेत. काही सेवांना, उदा., चारित्र प्रमाणपत्र, पासपोर्ट करता ना हरकत प्रमाणपत्र या सेवांना मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे व त्यांचा निपटारा ही चांगला आहे. परंतु अन्य अधिसूचित सेवांना अल्प प्रतिसाद मिळाला आहे. विभागाच्या सचिवांनी अल्प प्रतिसाद मिळालेल्या सेवांचा आढावा घ्यावा व विश्लेषण करावे. | प्रलंबित |
| | **परिवहन विभाग** | |
| ३ | परिवहन विभागाच्या एकूण ११० सेवांची मास्टर लिस्ट तयार असून त्यापैकी ३६ सेवा अधिसूचित करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याबाबत लवकर निर्णय घेण्यात यावा, या सेवांचे आपले सरकार पोर्टलसोबत इंटिग्रेशन करण्यात यावे. | प्रलंबित |
| | **महसूल विभाग** | |
| ४ | १. महसूल विभागांतर्गत सर्व केंद्रांवर अधिनियमांतर्गत अधिसूचित केलेल्या सर्व सेवा देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा.<br>२. नोंदणी व मुद्रांकशुल्क विभागाच्या १४ सेवा अद्यापपर्यंत आपले सरकार पोर्टलशी पूर्णत: इंटिग्रेट झालेल्या नाहीत, त्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. | कार्यवाही पूर्ण |

| | | |
|---|---|---|
| | **कृषी विभाग** | |
| ५ | १. माती नमुना तपासणी बाबतच्या ५ सेवांना अत्यल्प प्रतिसाद दिसून येतो. याबाबत विभागाने आढावा घ्यावा.<br>२. केंद्र शासनाच्या ‘अपेडा’ पोर्टलशी संबंधित असणाऱ्या फळ निर्यातीबाबतच्या ४ सेवांकरीता केंद्र शासनाच्या पोर्टलशी इंटिग्रेशन करण्याबाबत विभागाकडून पाठपुरावा करावा.<br>३. “अपेडा पोर्टल”वर दिल्या जाणाऱ्या सेवांचे आपले सरकार पोर्टलशी इंटिग्रेशन करणे शक्य नसल्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे. अशा सेवांसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची मासिक आकडेवारी आपले सरकार पोर्टलवर सुधारित करावी. | प्रलंबित |
| | **सामाजिक न्याय विभाग** | |
| ६ | या विभागाच्या काही योजनांना आपले सरकार पोर्टलवर अत्यल्प प्रतिसाद दिसतो तथापि, या योजनांना ऑफलाईन पध्दतीने मोठा प्रतिसाद प्राप्त झालेला आहे. अशा योजनांची आज्ञावली तयार करुन त्याची चाचणी घेण्यात यावी. जेणेकरुन या योजना ऑनलाईन उपलब्ध होतील. | प्रलंबित |
| | **महिला व बालकल्याण विभाग** | |
| ७ | १. या विभागाच्या १३ सेवा अधिसूचित असून बहुतांश सेवां या अंगणवाडी सेविकांमार्फत घरोघरी जाऊन देण्यात येत असल्याने, ऑनलाईन अर्जांचे प्रमाण कमी दिसून येते. याबाबत विभागाने आढावा घेऊन देण्यात आलेल्या सेवेची सांख्यिकी माहिती ही आपले सरकार पोर्टलवर प्रसिद्ध करावी.<br>२. प्रत्यक्ष लाभार्थ्यांची संख्या मोठी असूनही ऑनलाईन प्रणालीवर अर्ज सादर होत नसल्याने लाभार्थी संख्या कमी दिसून येते. विभागाने प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत लाभार्थी संख्येचे संकलन करून महाऑनलाईनला देण्यात यावे. महाऑनलाईनने लाभार्थी संख्या आपले सरकार पोर्टलवर प्रसिद्ध करावी. | प्रलंबित |
| | **अन्न व नागरी पुरवठा विभाग** | |
| ८ | विभागाकडून देण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या मोठी असल्याने व सर्व सेवांचे ऑनलाईन पोर्टलचे आपले सरकार पोर्टलशी इंटिग्रेशन करण्यात यावे. | प्रलंबित |
| | **पशु संवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य विभाग** | |
| ९ | या विभागाच्या सर्व सेवा क्षेत्रिय कार्यालय स्तरावर केवळ १ रूपया नाममात्र शुल्क आकारून देण्यात येतात,तर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना २० रू. शुल्क भरावे लागते. यामुळे ऑनलाईन अर्जांचे प्रमाण कमी आहे.विभागाने प्रत्यक्ष दिलेल्या सेवांची आकडेवारी महाऑनलाईनला उपलब्ध करुन द्यावी. | प्रलंबित |
| | **आदिवासी विकास विभाग** | |
| १० | आदिवासी विकास विभागाने स्वयं-पोर्टल तयार केला आहे. शासनाच्या धोरणाप्रमाणे स्वयं-पोर्टल व आपले सरकार पोर्टल यांचे इंटिग्रेशन करण्याची गरज आहे. | प्रलंबित |

| | | |
|---|---|---|
| **विधी व न्याय विभाग** | | |
| ११ | राज्य विधीसेवा प्राधिकरणाने द्यावयाचे कायदेविषयक मोफत सहाय्य या सेवेकरिता केंद्रशासनाची NALSA ही स्वतंत्र प्रणाली अस्तित्वात आहे. या प्रणालीचे आपले सरकार पोर्टलशी इंटिग्रेशन करण्याकरिता केंद्र शासनाची परवानगी विभागाकडून घेण्यात यावी. ऑफलाईन पध्दतीने मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होतात ते अर्ज ऑनलाईन पध्दतीने कसे घेता येईल याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. | प्रलंबित |
| **गृहनिर्माण विभाग** | | |
| १२ | म्हाडा व आपले सरकार पोर्टलचे इंटिग्रेशन करण्यात यावे. | कार्यवाही पूर्ण |
| **अल्पसंख्यांक विकास विभाग** | | |
| १३ | NSPT हे केंद्र शासनाचे शिष्यवृत्ती पोर्टल आहे. राज्य शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत नवीन पोर्टल सुरु होत आहे. हे पोर्टल सर्व विभागांच्या शिष्यवृत्ती करीता राहणार आ़हे. या पोर्टलचे आपले सरकार पोर्टलशी इंटिग्रेशन करण्यात यावे. | प्रलंबित |
| **नगर विकास विभाग** | | |
| १४ | १. नगर विकास विभागाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांशी नागरिकांचा मोठया प्रमाणात संपर्क येत असल्याने त्यांच्या सर्व सेवांचे इंटीग्रेशन करण्यात यावे. | प्रलंबित |
| | २. या विभागाच्या ज्या सेवा केंद्र सरकारच्या पोर्टलवरून दिल्या जातात त्या केंद्र सरकारच्या पोर्टलचे आपले सरकार पोर्टलशी इंटीग्रेशन करावे. | प्रलंबित |
| | ३. आपले सरकार सेवा केंद्र / नागरी सुविधा केंद्रावर फक्त नगर विकास विभागाच्या सेवा न देता शासनाच्या सर्व विभागांनी अधिसूचित केलेल्या सर्व सेवा नागरिकांना पुरविण्यात याव्यात. | नगर विकास विभागाने शासन निर्णय निर्गमित केला आहे. |
| **ग्रामविकास व पंचायतराज विभाग** | | |
| १५ | १. पुणे जिल्हा परिषदेने २०० सेवा अधिसूचित केलेल्या आहेत ही प्रशांसनिय बाब आहे. त्याच धर्तीवार इतर जिल्हा परिषदेने ही आपल्या सेवा अधिसूचित कराव्यात. | ग्राम विकास विभागाने दिनांक १४.०३.२०१९ आदेशान्वये समिती स्थापन केली आहे. ही बाब शासनाच्या विचाराधिन आहे. |
| | २. ग्रामविकास विभागाच्या यशोगाथा, नाविन्यपूर्ण प्रकल्प व चांगल्या कार्यपध्दतीचे संकलन करून एकत्रित अहवाल आयोगास सादर करावा. | प्रलंबित |
| | ३. महाऑनलाईनकडून तयार करण्यात आलेले डॅशबोर्ड सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी व गट विकास अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात यावेत. सर्व प्रलंबित अर्ज, अपिले आणि विलंबाची सर्व प्रकरणे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांनी नियंत्रण ठेवावे. | |
| | ४. विविध विभागांच्या सेवा ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांमधून एक खिडकी पध्दतीने उपलब्ध करून दिल्या जाव्यात. | |
| | ५. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाचे बोधचिन्ह ( Logo) व घोषवाक्य (Tag line) चा वापर ग्रामपंचायत, पंचायत समिती | |

| | | |
|---|---|---|
| | व जिल्हा परिषद यांनी करावा. | |
| **उच्च व तंत्रशिक्षण विभाग** | | |
| १६ | १. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या एकूण १० सेवा अधिसुचित असून त्या सेवा ऑनलाईन पद्धतीने देण्यात येतात. विभागाची मास्टर लिस्ट तयार नसून लवकर तयार करण्यात यावी.<br>२. उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन आभ्यासक्रमात या कायद्याचा समावेश करण्यात यावा. | प्रलंबित |
| **शालेय शिक्षण व क्रिडा विभाग** | | |
| १७ | या विभागाची मास्टर लिस्ट तयार करुन ती सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात यावी या विभागाच्या १८ सेवा अधिसुचित करण्यात आल्या होत्या त्यापैकी ०६ सेवा वगळण्यात आल्या असून सद्यस्थितीत १२ सेवा अधिसूचित आहेत. | मास्टर लिस्ट तयार करण्यात आली आहे |
| **पर्यटन विभाग** | | |
| १८ | या विभागाच्या २० सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत या सर्व सेवा ऑनलाईन पद्धतीने देण्यात येत असून काही सेवांना अत्यल्प प्रतिसाद आहे. पर्यटन हे महत्वाचे व सातत्याने वाढत जाणारे क्षेत्र असल्याने,याबाबत विभाग प्रमुखांनी आढावा घेऊन आयोगास अहवाल सादर करावा. | प्रलंबित |
| **वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग** | | |
| १९ | १. या विभागाच्या एकूण २५ सेवा असून त्यापैकी १८ सेवा ऑनलाईन आहेत. उर्वरित सेवा ऑनलाईन उपलब्ध करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.<br>२. विभागाकडून एकत्रित मास्टर लिस्ट तयार करण्यात यावी व ती सेवांची यादी सामान्य प्रशासन विभाग व आयोगास उपलब्ध करुन देण्यात यावी. | प्रलंबित |

## ६.५ पुढील वाटचाल

सामान्य माणूस हा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाचा केंद्रबिंदू आहे. नागरिकांना कार्यक्षम, पारदर्शक व कालबद्ध पद्धतीने लोकसेवा उपलब्ध व्हाव्यात हे अधिनियमाचे उद्दिष्ट आहे. सदर अधिनियम काटेकोरपणे अंमलात आणल्यास प्रशासनात अमुलाग्र परिवर्तन होऊन होऊन प्रशासन अधिक लोकाभिमुख होईल. अधिक सुधारणा करण्यासाठी आयोगाने आपल्या आधीच्या शिफारशी पुनरुक्त करीत आहे.

१. जनजागृती मोहिमा मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आल्या पाहिजेत. सर्व शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, लोकप्रतिनिधी, नागरी समाज, सामाजिक माध्यमे, बिगर शासकीय संस्था ह्यांनी सदर जनजागृती अभियानात सहभागी होणे आवश्यक आहे. दरवर्षी सेवा पंधरवडा साजरा होणे आवश्यक आहे.

२. प्रत्येक विभागाने सर्व लोकसेवांची एक सर्वसमावेशक यादी तयार करून ती सार्वजनिक कार्यक्षेत्रात प्रकाशित करणे आवश्यक आहे. राज्य शासनाने सर्व सेवांची एकत्रित केंद्रीकृत सर्वसमावेशक यादी प्रकाशित करणे आवश्यक आहे.

३. राज्य शासनाच्या सर्व विभाग, उपक्रम, प्राधिकरण, स्थानिक स्वराज्य संस्था, मार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत अधिसूचित होण्याचा कालावधी निर्धारित करण्यासाठी एक वेळापत्रक राज्य शासनाने प्रकाशित करणे आवश्यक आहे .

४. सर्व अधिसूचित सेवांचे आपले सरकार पोर्टलशी व मोबाईल ॲप यांच्याशी एकत्रीकरण अतिशय आवश्यक आहे. ८० प्रकारच्या सेवा आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण केल्या नसल्याबाबत मागील आढावा बैठकीमध्ये आयोगाने नोंद घेतली होती. महानगरपालिका, नगर परिषद, ह्या सारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून अनेक सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत, पण नगर विकास विभागाने अधिसूचित केलेल्या सेवा आपले सरकार पोर्टलशी अद्याप जोडल्या गेलेल्या नाहीत.

५. सेवांची मागणी करणारे अनेक अर्ज ऑफलाईन पद्धतीने मोठ्या प्रमाणावर प्राप्त होतात. अशा पद्धतीने प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जाची विभागाने ऑनलाईन नोंदणी होणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यावरील कार्यवाहीचे संनियंत्रण करता येईल .

६. राज्यामध्ये ३०,८७८ आपले सरकार सेवा केंद्र कार्यरत आहेत व तिथे नागरिकांना ऑनलाईन सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र अशा केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होणे गरजेचे आहे.

७. आपले सरकार सेवा केंद्रात सर्व अधिसूचित सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर सर्व केंद्रे आपले सरकार सेवा केंद्र म्हणून ओळखली जातील असा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णय स्वागतार्ह आहे.

८. लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी"नियंत्रण अधिकारी"म्हणून नेमण्याचा निर्णय हे या दिशेने टाकलेले एक योग्य पाऊल आहे. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने दरमहा अधिनियमाच्या अंमलबजावणी मधील प्रगतीचा आढावा घेणे आवश्यक आहे. असा मासिक आढावा विभागीय आयुक्तांनी सुद्धा घ्यावा.

९. मा.पालकमंत्री महोदयांना जिल्ह्याच्या दौऱ्याच्या वेळेस लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात यावा अशी विनंती करण्यात यावी.

१०. जनतेकडून अत्यल्प किंवा कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही अशा अनेक सेवा आहेत. संबंधित विभागांनी त्यामागील कारणमीमांसा जाणून त्याचे विश्लेषण केले पाहिजे. सदर सेवांना का प्रतिसाद

मिळत नाही , या बाबत जनतेचे मत विचारात घेण्यात यावे.

११. ऑनलाईन व ऑफलाईन प्रणालींच्या कार्यपद्धतीचे त्रयस्थ यंत्रणे मार्फत लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक आहे.

१२. आपले सरकार पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात आलेल्या सेवेपोटीचा महसूल संबंधित विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थेला तत्काळ मिळण्याची खबरदारी माहिती तंत्रज्ञान विभागाने घेणे आवश्यक आहे.

१३. उत्तम कामगिरी करणाऱ्या कर्मचारी / अधिकाऱ्यांसाठी प्रत्येक विभागाने प्रोत्साहन व पुरस्कार योजना आखणे आवश्यक आहे.

१४. प्रत्येक पदनिर्देशित अधिकारी, अपिलीय प्राधिकारी व जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित आवश्यक बाबी उपलब्ध करून देण्यात आल्या पाहिजेत.

१५. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या कलम ७ नुसार राज्य शासनाने सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना विहित कालमर्यादेत सेवा उपलब्ध करून देण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहित केले पाहिजे. लोकसेवा अधिनियमानुसार अनेक अर्ज ऑफलाईन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे. आयोगाने अनेकवेळा प्रयत्न करून सुद्धा प्राप्त झालेल्या व निराकरण केलेल्या व प्रलंबित ऑफलाईन अर्जांची आकडेवारी उपलब्ध झालेली नाही.

१६. राज्यात ३०,८७८ आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन करण्यात आल्याचे माहिती तंत्रज्ञान विभागाने कळविले आहे. त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंतर्गत सर्व सेवा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने कालबद्ध धोरण तयार करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१७. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या कलम १३(२)(ब) नुसार राज्यातील सहा विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी सहा लोकसेवा हक्क आयुक्तांची नेमणूक प्राधान्याने करणे आवश्यक आहे.

१८. अनेक विभागांनी वेगवेगळी पोर्टल विकसित केलेली असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आल्यामुळे अधिसूचित सेवा एकाच मंचावरून दिल्या जाण्याच्या धोरणाबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे. विविध विभागांनी विकसित केलेली विविध पोर्टल आपले सरकार पोर्टलशी एकीकृत करण्यात यावीत यावर आयोग सातत्याने भर देत आहे. सातत्याने आढावा घेऊन व सूचना देऊन सुद्धा दिनांक ३१.०३.२०१९ पर्यंत ८० सेवांचे अद्याप आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण झालेले नाही.

१९. नगर विकास विभागाने आपल्या ३३ सेवांचे अद्याप आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण केलेले नाही. एकाच मंचावरून नागरिकांना सर्व सेवा उपलब्ध करण्यात याव्यात हे राज्य शासनाचे धोरण

आहे. नगर विकास विभागाने या धोरणानुसार ३३ सेवांचे एकत्रीकरण अद्याप केलेले नाही. ही एक महत्वाची उणीव आहे कारण राज्यातील जवळपास ५०% जनता शहरी भागात वास्तव्य करीत आहे. आयोगाने नगर विकास विभागाबरोबर अनेक वेळा बैठका घेऊन सुद्धा या विभागाच्या ३३ सेवांचे अद्याप आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण साध्य झालेले नाही.

२०. भारत सरकारचे थेट लाभ अंतरण पोर्टल, (DBT) तसेच अपेडा, वाहन, सारथी या पोर्टलचे आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे या परिस्थितीमध्ये नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होतो. मात्र केंद्र शासनाने विकसित केलेल्या कोणत्याही पोर्टलशी एकत्रीकरण करताना केंद्र शासनाची पूर्व परवानगी आवश्यक आहे. केंद्र शासनाचे थेट लाभ अंतरण पोर्टल (DBT) किंवा अन्य अशा पोर्टल वर उपलब्ध असलेल्या अधिसूचित सेवा याबाबत राज्य शासनाने स्पष्ट धोरण विहित करणे आवश्यक आहे.

२१. सन २०१८-१९ च्या दरम्यान वेळेवर सेवा देण्याचे प्रमाण फक्त ४७% व विलंबाने सेवा देण्याचे प्रमाण ५३% असल्याचे महत्वपूर्ण निरीक्षण आयोगाने नोंदविले आहे. महसूल विभागाकडून सेवा पुरवण्यात होत असलेल्या विलंबामुळे सदर प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. सदर बाबत महसूल विभागाकडे खुलासा विचारण्यात आला असता, महसूल विभागाने असे कळविले आहे निवडणूक, नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना साहाय्य देणे व पंतप्रधान किसान सन्मान योजनेची अंमलबजावणी अशा कारणांमुळे विलंब झाला. तसेच पुढील वर्षात सेवा देण्यातील विलंब टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन महसूल विभागाने दिले आहे.

२२. ऑफलाईन प्राप्त अर्ज व त्यांच्यावरील कार्यवाही ह्याबाबत माहितीचा अभाव ही आयोगापुढील एक महत्वाची समस्या आहे. या माहितीच्या अभावामुळे ऑफलाईन अर्जांच्या प्रलंबित असण्याबाबत तसेच त्यावर कार्यवाही करण्यात विलंब होत असल्याबाबत कोणतेही विश्लेषण करणे शक्य नाही. सदर माहिती संकलित करण्यासाठी आयोगाने “अ ” “ ब ” व “ क ” असे नमुने सर्व विभागांना विहित केले होते, परंतू वारंवार प्रयत्न करून सुद्धा एकत्रित स्वरुपात विभागांच्या कडून ही माहिती आयोगाला सादर करण्यात येत नाही. माहिती तंत्रज्ञानाचा आधार घेऊन माहिती संकलित करण्याची शिफारस आयोगाने केली आहे. शासनाने सदर प्रस्तावावर लवकर निर्णय घेणे आवश्यक आहे.

२३. सर्व अधिसूचित सेवा ऑनलाईन उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र दिनांक ३१.०३.२०१९ रोजी ४८६ अधिसूचित सेवांपैकी फक्त ४०६ सेवाच ऑनलाईन उपलब्ध असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे उर्वरित ८० अधिसूचित सेवा या ऑफलाईन अर्ज करूनच प्राप्त करता येतात. अधिसूचित सेवा व प्रत्यक्ष ऑनलाईन उपलब्ध असणाऱ्या सेवा यामधील दरी त्वरित

भरून काढण्याची गरज आहे. प्रत्येक अधिसूचित सेवा ऑनलाईन उपलब्ध असेल यासाठी आवश्यक उपाययोजना त्वरेने करणे आवश्यक आहे.

२४. दिनांक ३१.०३.२०१९ पर्यंत राज्यभरात जरी ३०,८७८ आपले सरकार सेवा केंद्रे सेवा पुरवत असली, तरीही फक्त १४,५५६ केंद्रे सक्रीय असल्याचे व १६,३२२ केंद्रे निष्क्रिय असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. १६,३२२ केंन्द्रे निष्क्रिय असल्याची बाब चिंताजनक आहे. सदर केंद्रे आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी उपाययोजना आवश्यक आहे. चंद्रपूर आणि वर्धा जिल्ह्यात हाती घेतलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे सदर केंद्रे आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल.

## ६.६ नाविन्यपूर्ण उपक्रम

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अधिक प्रभावी अंमलबजावणी साठी राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. असे उपक्रम व पद्धतींची आयोग आवर्जून दखल घेऊन त्याबाबत संबंधितांचे कौतुक करत आहे व असे उपक्रम राज्यव्यापी करण्याची शिफारस करीत आहे.

१. **जिल्हा परिषद पुणे**: ग्रामविकास व पंचायतराज विभागाने १३ सेवा अधिसूचित केल्या आहेत. मात्र पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री सुरज मांढरे यांनी पुढाकार घेऊन २०० सेवा महाराष्ट्र लोकसेवा अधिनियमाच्या अंतर्गत अधिसूचित केल्या. प्रभावी संनियंत्रण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला. अन्य जिल्हा परिषदांमध्ये सुद्धा सदर २०० सेवा अधिसूचित करण्याची प्रक्रिया करण्याबाबत ग्रामविकास व पंचायतराज विभागाने तपासणी करण्याची शिफारस आयोगाने केली आहे. त्यावर सदर सेवा राज्यव्यापी करण्याची बाब तपासण्यासाठी समिती नेमली असून सदर बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे ग्रामविकास व पंचायतराज विभागाने आयोगाला कळविले आहे.

२. **चंद्रपूर जिल्हा**: जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्रे परीचालीत करण्याचे काम महिला स्वयंसहाय्ता बचत गटांकडे सोपविल्याचे चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्याच्या दरम्यान आयोगाला आढळून आले. सदर केंद्रे परीचालीत करणाऱ्या महिला सभासदांना प्रशिक्षण व गणवेश देण्यात आला आहे. सदर केंद्रे अतिशय कार्यक्षम पद्धतीने परीचालीत करण्यात येत आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात प्रकर्षाने जाणवलेली आणखी एक बाब म्हणजे महसूल विभागाच्या सर्व सेवा ऑनलाईन

स्वरूपातच देण्यात येतात. जिल्हाधिकारी श्री आशुतोष सलील व श्री कुणाल खेमनर हे दोघेही कौतुकास पात्र आहेत.

३. **वर्धा जिल्हा**: वर्धा जिल्ह्यामध्ये लोक जिथे मोठ्या प्रमाणावर जातात अशा ठिकाणी उदाहरणार्थ जिल्हा रुग्णालय, पंचायत समिती, नगर परिषद अशा स्थानी सेवा देण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. जिल्हाधिकारी श्री शैलेश नवल यांनी आपले सरकार सेवा केंद्रे परीचालीत करण्याची जबाबदारी जिल्ह्यातील महिला स्वयंसाहाय्य बचत गटांना सोपविली. महिला सबलीकरणासाठी हे एक महत्वाचे पाऊल आहे. सेवा पुरविण्याशिवाय जिल्हा रुग्णालयातील सेवा केंद्रात आधार कार्ड देण्याची तसेच नाव किंवा पत्ता इत्यादी तपशिलात बदल करण्याची सुविधा पुरविण्यात येते. तसेच आधार कार्डाशी जोडलेल्या बँक खात्यातून रु १०,००० पर्यंत रक्कम काढण्याची सुविधा तिथे उपलब्ध आहे.सदर सर्व केंद्रे आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी स्वयंसहाय्य बचत गटांची उत्पादने सुद्धा इथे विक्रीसाठी ठेवण्यात आली. तसेच सूक्ष्म ए टी एम सेवा सुद्धा सदर केंद्रांशी जोडून ती आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे .

४. **अहमदनगर व वाशीम जिल्हा** : अहमदनगर व वाशीम जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये लोकसेवा देण्याचा नाविन्यपूर्ण व लोकाभिमुख प्रयोग करण्यात आला आहे. ADTM मशीन व टच स्क्रीन तंत्रज्ञानाच्या द्वारे खालील पाच सेवा नागरिकांना उपलब्ध करून दिल्या आहेत:

अ. ७/१२ उतारा
आ. फेरफार उतारा
इ. हक्क नोंदणी रजिस्टर
ई. कोतवाल पुस्तिका नक्कल
उ. पेरे पत्रक

फक्त रु २.५० लाखाची गुंतवणूक करून ADTM केंद्राने आतापर्यंत रु ४.०३ लाख महसूल प्राप्त झाला असल्याचे जिल्हाधिकारी श्री राहुल द्विवेदी यांनी सांगितले. त्यामुळे सदर प्रयोग हा आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण आहे. यामध्ये सेवांचा लाभ घेण्यासाठी कुठलाही अर्ज करावा लागत नाही.

अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांचा अवलंब केल्यास अधिनियमाची अंमलबजावणी अधिक प्रभावशाली करता येईल. अशा उपक्रमांची नोंद घेऊन ते राज्यव्यापी करण्याच शिफारस आयोग करीत आहे.

# परिशिष्ट – अ

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ३२(३)] शुक्रवार, ऑगस्ट २१, २०१५/श्रावण ३०, शके १९३७ [पृष्ठे ११, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.—**महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम. . . पृष्ठे १–११

दिनांक १९ ऑगस्ट २०१५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**डॉ. मंगला ठोंबरे,**
प्रभारी प्रारूपकार-*नि*-सहसचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २१ ऑगस्ट २०१५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि पात्र व्यक्तींना लोकसेवा देणाऱ्या शासकीय विभागांमध्ये व अभिकरणांमध्ये आणि इतर सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व आणण्यासाठी आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी एक सर्वसमावेशक कायदा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २८ एप्रिल २०१५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ प्रख्यापित केला होता ;

२०१५ चा महा. अध्या. ५.

**आणि, ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक २८ एप्रिल २०१५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(४) तो, कोणतेही कायदे, नियम, अधिसूचना, आदेश, शासन निर्णय अथवा अन्य कोणतेही संलेख यांच्या तरतुदींनुसार पात्र व्यक्तींना लोकसेवा देणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणांना लागू असेल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(क) " मुख्य आयुक्त " किंवा " आयुक्त " याचा अर्थ, कलम १३ च्या पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेला राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त किंवा, यथास्थिति, राज्य सेवा हक्क आयुक्त, असा आहे;

(ख) " आयोग " याचा अर्थ, कलम १३ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित करण्यात आलेला महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, असा आहे;

(ग) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, शिस्तभंगविषयक प्राधिकारी किंवा, यथास्थिति, नियंत्रक अधिकारी, असा आहे;

(घ) " विभाग " याचा अर्थ, राज्य शासनाचा किंवा, यथास्थिति, एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाचा विभाग, असा आहे;

(ङ) " पदनिर्देशित अधिकारी " याचा अर्थ, ज्याने पात्र व्यक्तीला लोकसेवा देणे आवश्यक आहे असा अधिकारी, असा आहे;

